रा. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय
क्र. क. १२२७८
IRBK-0112279

१२२७९ ४९१७५

27 JUN 1973

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

पुस्तक परत करावे,

IRBK-0112279

कुमारकथा –२४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम ४५५७७ वि. बाबा.
क्रमांक ३३७७ नोंद दि.

मायकेल स्ट्रॉगॉफ

(Michel Strogoff)

मूळ लेखक
ज्यूलस व्हरने

रूपांतरकार
आचार्य सी. म. बापट

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा
वा. क्र. १२२८९ नों दि.
वि. बा. वा. किंमत २ रुपये

अभिनव प्रकाशन, बेळगांव

सजावट :–

कु. सरोज गजेंद्रगडकर

मुखपृष्ठ :–

कु. सरोज गजेंद्रगडकर

कव्हर छपाई :–

अभिनव प्रेस ,बेळगांव

मुद्रक :–

वि. गो. पाटणेकर, अभिनव प्रिंटिंग प्रेस बेळगांव

प्रकाशक :–

र. गो. पाटणेकर, अभिनव प्रकाशन, बेळगांव

१. संकटाची छाया

ऐतिहासिक कालापासून रशिया हा एक बलाढ्य देश म्हणून प्रसिद्ध आहे. त्याचा विस्तारही तसाच अफाट आहे. जगाच्या अर्ध्या भूप्रदेशावर त्याचे साम्राज्य पसरलेले आहे. उत्तरेकडील आर्टिक्ट महासागरापासून तो थेट चीनच्या सरहद्दीपर्यंत त्याची सीमा भिडलेली आहे. दक्षिणेस कॅस्पीयन समुद्र, काळा समुद्र, अफगाणिस्तान व तार्तरी प्रदेशाला त्याची हद्द लागलेली आहे.

मास्को ही रशियाची इतिहासप्रसिद्ध व वैभवशाली राजधानी होय. तेथील भव्य राजवाड्यात

रशियाचा बादशहा मोठ्या थाटामाटाने रहात असे. त्याला 'झार' अशी संज्ञा होती. त्याचा भाऊ 'ग्रँड ड्यूक' हा सैबेरीयाच्या सरहद्दीवरील इर्कुटस्क या ठिकाणी रहात असे. झारच्या खालोखाल त्याचा अधिकार व दर्जा होता. गुन्हेगाराना सैबेरीयाच्या बर्फाळ व ओसाड मुलखात पाठविण्याची पद्धत पूर्वीपासून रशियन राजवटीत चालू होती. रशियाच्या पूर्वेकडील साम्राज्यात ओम्स्क, टोमस्क, इर्कुटस्क ते व्लॅडीव्होस्टॉक असा अतिविस्तृत रेल्वेमार्ग आखण्यात आला होता. त्यामुळे मास्कोपासून दोन्हीकडील भागाशी दळणवळण ठेवणे सुलभ जाई. या अतिशय विस्तीर्ण रेल्वे लाईनवर तारांचे खांब उभे केलेले होते. ही तारायंत्राची सोय सव्वाशे वर्षापूर्वी (१८४०) केलेली होती, ही गोष्ट विशेष लक्षात ठेवण्यासारखी आहे.

याच काळातील एक चित्तथरारक कथा येथे गुंफण्यात येत आहे. कथा जुनी असली तरी तिच्यामधील घटनांचा व प्रसंगाचा ताजेपणा कायम राहिला आहे. चांगली गोष्ट कधीच जुनी होत नाही. सूर्य हा फार पुरातन आहे, म्हणून त्याचा प्रकाश कधी शिळा झाला आहे काय ?

रशियाची सरहद्द दक्षिणेकडे जेथे तार्तरी प्रदेशाला भिडलेली आहे, तेथे नेहमी दंगेधोपे चालू असत. इर्कु-टस्क हे रशिया व सैबेरिया यांच्या सरसीमेवरील अत्यंत महत्वाचे ठाणे होते. येथे रशियन सैन्याची मोठी छावणी असून एकंदर बंदोबस्त अतिशय कडक होता. येथील कारभाराची सर्व सूत्रे ग्रँड ड्यूकच्या हातात होती.

मास्को येथील झारचा भव्य राजप्रासाद पताका तोरणांनी शृंगारला होता. दिव्यांची नयनमनोहर रोष-णाई केली होती. अत्तरांचा अन् फुलांच्या सुगंधाचा घमघमाट सर्वत्र पसरला होता. झारचे राजवैभव आपल्या दिव्य स्वरुपात तेथं प्रकट झाले. सारे सरदार, मानकरी आणि दरबारी मंडळी भपकेदार पोषाख करून दरबारला हजर झाली होती. सर्व स्त्री-पुरुषांचे चेहरे अपूर्व आनंदाने फुलले होते.

दरबारचा मुख्य कार्यक्रम नुकताच आटोपला होता. अतिशय सुंदर रीतीने सजविलेल्या विशाल दिवाणखा-न्यात सामुहिक नृत्याला सुरवात झाली. विलासी जोडपी कमरेभोवती हातांचे विळखे घालून मंजुळ वाद्यांचा तालावर आपली पावले टाकत मागेपुढे झुलू लागली. सुरेल संगीत, गोड कुजबूज आणि लयबद्ध पदन्यास यांच्या मंद मधुर निनादांनी तो भव्य राजमहाल स्वर्गीय सुखाच्या

धुंदीत दंग झाला. खुद्द झार आपल्या लाडक्या राणीसह (झरीना) त्या नाचात रंगून गेला होता.

मध्यरात्रीचा प्रहर झाला. नृत्य ऐन रंगात आले. सारी मंडळी आनंदाने बेहोष झाली होती. तेवढ्यात कोठेतरी पाल चुकचुकली! झारची हंसरी मुद्रा एकदम पालटली. त्याने आपल्या राणीला खूण केली आणि कुणाशी कांही न बोलता दिवाणखान्याच्या पायऱ्या झर–झर उतरुन तो आपल्या खास महालाकडे वळला! कसली तरी अशुभ सांवली त्या विशाल राजवाड्यावर पसरली आणि तेथील आनंदोत्सवाला गालबोट लागले!

सारी मंडळी आश्चर्यचकित झाली. संगीताचे स्वर मंद होऊन नृत्य समारंभाचा उत्साह झरकन् ओसरला. काय घडले त्याचा अंदाज कुणालाच करता येईना. जो तो एकमेकाच्या तोंडाकडे टकमक पाहू लागला. त्या कार्यक्रमाला दोन वृत्तपत्रकार आले होते. एक होता फ्रेंच अन् दुसरा होता इंग्रज माणूस. पहिल्याचे नांव होते ॲल्साइड जॉलीव्हे अन् दुसरा होता हॅरी ब्लाऊंट ! ते दोघे फार हुषार असून बातम्या काढण्यात पटाईत होते. याच कामासाठी ते वाऱ्यासारखे चोहीकडे फिरत. वृत्तपत्रांच्या बातमीदारांना कुठेही जाण्याची मुभा असते. पहिली महत्वाची बातमी आपल्यासच

मिळाली पाहिजे अशी त्यांची धडपड अहोरात्र सुरू असते. कारण त्यावरच त्यांच्या व्यवसायाचे व वर्तमान-पत्रांचे भवितव्य अवलंबून असते. म्हणून वृत्तपत्रांचे बातमीदार राजकीय हेरा इतकेच बिलंदर असतात. जॉलीव्हे व ब्लाऊंट हे दोघे असेच चतुर असून त्यांच्या-मध्ये धंद्याच्या दृष्टीने स्पर्धा होती.

झार अचानक नृत्य सोडून का निघून गेला, याचा कानोसा त्यांनी शिकारी कुत्र्याप्रमाणे घेतला. पण त्या दोघांना त्याचा कांहीच वास लागला नाही. दिवाण-खान्यातली सारी स्त्री पुरुष मंडळी आपल्या मनाशीं निरनिराळे तर्क लढविण्यात गर्क झाली. एकमेकाशी हलक्या आवाजात बोलत सारे निमंत्रित पाहुणे आपा-पल्या मकाणाकडे वळले अन् थोड्याच वेळात त्या विस्तीर्ण महालात शुकशुकाट पसरला.

ह्या अघटित प्रकार काय आहे, त्याचा छडा लाव-ण्यासाठी जॉलीव्हे व ब्लाऊंट या दोघांनी कसून प्रयत्न केला. तेथे आलेल्या लहान थोर मंडळींच्या कानांशी ते लागले, अमीर-उमरावांच्या कुजबुजीतून कांही धागा लागतो का पाहिले, पहाऱ्यावरच्या शिपायांच्याजवळ बारीक चौकशी त्यांनी केली, पण त्यांच्या पदरात

कांहीच पडले नाही. तथापि ते दोघे निराश झाले नाहीत.

मग त्यांनी आपल्यातली चुरस थांबवून सह-कार्याने या प्रकरणाचा तपास करण्याचे ठरविले. खुद्द झार ऐन समारंभातून निघून जातो, ही गोष्ट कांही क्षुल्लक नव्हती. त्याच्या साम्राज्यात कोठे कांहीतरी खास गडबड उडाली असली पाहिजे. त्या शिवाय तो असा अचानक बेचैन होणार नाही. देशात कोणत्यातरी भागात बंड, कैद्यांची दंगल, परक्यांची स्वारी, तार्तरी लोकांचा उठाव अथवा कसली तरी भयानक उलथा-पालथ झाली असावी. परकीय हेरांनी कोठेतरी भयंकर कारस्थान केले असण्याचीही शक्यता होती. तसा एकादा अवचित प्रकार या खास नृत्याच्या सोहळयात झाला नसेल कशावरून ?

हा विचार मनांत येऊन जॉलीव्हे व ब्लाऊंट भलतेच अस्वस्थ झाले. त्या दोघांनी थोडा वेळ खलबत केले. गुप्त कटाचा किंवा हेरगिरीचा हा चमत्कार असेल, असा संशय त्यांना आला. त्याचा शोध घेण्या-साठी ब्लाऊंट राजवाड्याच्या मार्गावर पाळत ठेवून राहिला आणि जॉलीव्हे रेल्वे स्टेशनकडे लगबगीने गेला.

झार आपल्या महालाच्या सज्जात हातांचे स्वस्तिक करून विचारमग्न स्थितीत उभा होता. त्याच्या सभोवार ऐश्वर्यशाली मास्कोनगरी दिव्यांच्या तेजस्वी प्रकाशात झगमगत होती, पण तिकडे झारचे मुळीच लक्ष नव्हते. त्याच्या आसपासही कोणी दिसत नव्हते. मध्य-रात्रीच्या शांत वेळी तो एकटाच कसल्या तरी चिंतेने व्याकुळ झाला होता. दरबारच्या वेळचा सारा बाद–शाही पोषाख त्याच्या अंगावर तसाच होता. त्याचा एक सेवक मद्याची सुरई व एक पेला हातात घेऊन अगदी हळूच तेथे आला.

" ब्लॅव्हाटस्कीला ताबडतोब इकडं पाठवून दे ! " झारने त्याला फर्मावले. सेवक मस्तक झुकवून मागे फिरला. कांही क्षणांनी बावरलेला ब्लॅव्हाटस्की तेथे हजर झाला व मुजरा करून म्हणाला, " महाराज, टोम्स्कहून चिंताजनक वार्ता आली आहे. दंगलखोरांनी त्या भागातील सर्व तारा तोडून टाकल्या आहेत."

" मग तिकडील दळणवळणाच्या मार्गात अडथळा येऊन मोठाच गोंधळ माजला असेल !" झारच्या आवा-जात कंप उत्पन्न झाला होता.

" होय हुजूर, तारतरी टोळयांनी त्या बाजूला

बंडाळी सुरू केली आहे. इर्टीश व ओबी या नद्यांच्या पलीकडे त्यांच्या हालचाली चालू आहेत."

"हे लक्षण ठीक नाही. त्या राजद्रोही इव्हॅन ओगॅरेफचेच हे कारस्थान असलं पाहिजे. तो अत्यंत धोकेबाज प्राणी आहे. पूर्वीपासून तो माझ्या वाईटावर टपलेला आहे."

"कांही वर्षांपूर्वी राजद्रोहाच्या आरोपावरून त्याला ग्रँड ड्यूकनी हद्दपार केलं होतं. दंगेखोर तार्तर लोकांना तो सैबेरियात एकत्र जमवून बंडाची चिथावणी देत आहे."

"त्याच वेळीं त्या दुष्टाचा काटा काढून टाकण्या-विषयी मी ग्रँड ड्यूकला कळविलं होतं. पण आमचे बंधुराज पडले धर्मराजाचे अवतार! त्यानं त्याला दया दाखवून जिवंत सोडला. पण तो पुन्हा उलटून ग्रँड ड्यूकचा केव्हा घात करील ते सांगता येत नाही.

"होय सरकार, तसा धोका उत्पन्न होईल, असा संशय मलाही वाटतो."

"म्हणून त्याचा बंदोबस्त ताबडतोब झाला पाहिजे!" तोंच ग्रँड ड्यूकचा खलिता घेऊन एक जासूद तेथे प्रविष्ट झाला. झारने तो खलिता फोडून वाचताच

त्याचे डोळे रागाने तांबडेलाल झाले. "माझं भविष्य खरं झालं. तो बदमाष इव्हॅन ओगॅरेफ तार्तर बंडखोरांचा पुढारी होऊन माझ्या भावाच्या जिवावर उठला आहे. ग्रँड ड्यूक मोठ्या फिकीरीत आहे. त्याला सत्वर मदत पाठवायला हवी."

"पण तिकडं रसद पाठवून देण्याचा मार्ग बिन–धोक नाही." ब्लॅव्हाटस्की दबलेल्या आवाजात बोलला.

"त्या कृतघ्न इव्हॅनला प्रथम खतम् केला पाहिजे!" झार उजव्या हाताची मूठ उगारून गरजला. "तार्तरी टोळीवाल्यांनी इर्कुटस्कला वेढा घातलेला आहे, असं या खलित्यात स्वच्छ लिहिलंय. तो कपटी इव्हान ओगॅरेफ गोड बोलून माझ्या भावाचा गळा घोटीऊ. त्याला सावध करण्यासाठी तातडीचा संदेश पाठवायला हवा. सैन्याची कुमक तर धाडलीच पाहिजे. पण त्या आधी संदेश घेऊन जाणारा खात्रीचा अन् शेरदिलाचा राजदूत कोण आहे ते लौकर सांग! माझ्या साम्राज्यावरची अन् ग्रँड ड्यूकच्या प्राणावरची ही संकटाची छाया झटपट दूर झाली पाहिजे."

ब्लॅव्हॉटस्की अन् ग्रँड ड्यूकचा तो खास दूत दोघेही विचारात पडले. एकदम तो दूत उत्तेजित

होऊन म्हणाला, "खावींद, असा एक बहाद्दर माणूस मला आठवतोय."

"नांव काय त्याचं ?"

"मायकेल स्ट्रॉगॉफ !"

"त्याच्याबद्दल तुला विशेष काय माहिती आहे ?"

"तो मोठा शूर अन् सिंहाच्या छातीचा वीर आहे. वयाच्या चौदाव्या वर्षी त्यानं नुसत्या खंजीरानं अक्राळ विक्राळ अस्वल ठार केलं अन् ते प्रचंड धूड त्यानं एक-ट्यानंच पर्वतावरून वडिलांच्या घराकडं ओढत आणलं"

"तर मग तो मोठा बलदंड जवान असला पाहिजे."

"होय सरकार, त्याच्या सारखा हिंमतवान माणूस सहसा आढळत नाही. त्याची चिकाटी जबरदस्त आहे. अन्न पाण्याशिवाय तो लांबचा प्रवास करू शकतो. वातावरणातले अचानक बदल, वादळांची चाहूल, पशुपक्ष्यांचे आवाज तो अचूक ओळखतो. त्याच्या ठिकाणी कांही तरी अद्भुत शक्ती वास करते. आपली काळजी तो हमखास दूर करील !"

"अशी तुला खात्री वाटते ?"

"होय महाराज, म्हणूनच मी आपल्याजवळ त्याचा उल्लेख केला. शिवाय तो अतिशय इमानी आहे. कस-

त्याही संकटात तो डगमगत नाही. बर्फाळ डोंगर चढण्यात तो पटाईत आहे, जमिनीला कान लावून तो कोठून कसला आवाज येत आहे ते बिनचूक सांगतो, रानावनांतून वाटा शोधण्यात तो तरबेज आहे, बर्फाच्या कणांवरुन व पक्ष्यांच्या हालचालीवरुन तो कांही आडाखे बरोबर बांधतो. थोडक्यात सांगायचे झाल्यास कोणत्याही धाडसाच्या कामाला तो अगदी लायक मनुष्य आहे अन् तो महाराजांच्या खास पलटणीतला सैनिक आहे."

" होय का, मग तर सोन्याहून पिवळं झालं!" धिप्पाड झारच्या दाढीमिशांनी भरलेल्या उग्र चेहऱ्यावर मंद हास्य झळकले. " जा, त्याला सत्वर माझ्यापुढं हजर कर!"

" आज्ञा महाराज!" म्हणून कुर्नीसात करुन तो जासूद तेथून जलदीने बाहेर पडला.

—०—

२. नवी कामगिरी

झार पुन्हा विचारात रंगून सज्जात येरझाऱ्या घालू लागला ब्लॅव्हॉटस्की एका बाजूला स्तब्ध उभा राहिला. तो झारच्या मर्जीतला माणूस असून त्याच्याकडे झारचे खासगी दफ्तर होते. मधेच थांबून झारने त्याला प्रश्न केला, " या मायकेल स्ट्रॉगॉफबद्दल तुझं मत काय आहे ?"

" ग्रँड ड्यूकसाहेबांच्या त्या जासूदाने त्याच्याविषयी सांगितलेली माहिती खोटी नाही. तो माझ्याही चांगल्या ओळखीचा आहे. आपण मनाशी योजलेली कामगिरी तो नीट पार पाडील अशी मलाही उमेद वाटते."

" ब्लॅव्हॉटस्कीला झार आणखी कांही विचारणार, इतक्यात एक उंचापुरा, पाणीदार चेहऱ्याचा, निर्भय वृत्तीचा, अंगाने बळकट असा एक नवजवान धीर गंभीर चालीने बादशहापुढे आला व अदबीने सलाम करून उभा राहिला. बादशहाने आपल्या तीक्ष्ण नजरेने त्याला

आपादमस्तक न्याहाळले. त्याच्या मुद्रेवर प्रसन्नतेची छटा पसरली. त्याने ब्लॅव्हॉटस्कीला विचारले, " आम्हांला हवा असलेला तरुण तो हाच का ?" ब्लॅव्हॉटस्कीने 'होय' म्हणून मान डोलाविली. त्याला बाहेर जाण्याची इषारत करून बादशहा त्या तरुणाकडे वळला. त्याच्या मुखावर आपली करडी नजर रोखून बादशहाने त्याला विचारले, "सध्या तूं कोणत्या कामावर आहेस ?"

" बादशहाच्या हुजुरातीच्या पलटणीतला मी एक शिलेदार आहे." मायकेलने नम्रपणाने उत्तर केले.

" तुला एक नवी कामगिरी मी सांगणार आहे."

"ती योग्य रितीने बजावण्याची मी शिकस्त करीन."

" ठीक आहे. टोम्स्क शहराला शत्रूपासून भय निर्माण झाले आहे. ही वेळ मोठी आणीबाणीची आहे. शत्रूच्या गोटातून तुला गुपचूप जावं लागेल. तुझ्या वाटेत अनेक संकटं खडी असतील. पण त्याची पर्वा न करता तुला आपलं उद्दिष्ट गाठाव लागेल."

" त्यात मी कसलीच कसूर करणार नाही !"

" हे काम फार जोखमीचं आहे. आपल्या देशा-वर अन ग्रँड ड्युकच्या प्राणावर मोठं संकट आलंय. ते दूर होण्यासाठी तुला मी तिकडं पाठवीत आहे."

माझ्या प्राणांची बाजी लावून मी आपलं काम फत्ते करीन. आपण मुळीच चिंता करू नये !"

मायकेलचे निर्धाराचे उद्‌गार ऐकून झार मनात खूष झाला. त्याने त्याला विचारले, "तुझ्या घरची मंडळी कुठं आहेत ?'

"मला फक्त आई आहे व ती टोम्सला असते."

"तिला सुद्धा तू भेटता कामा नये. हे काम अत्यंत गुप्त स्वरूपाचं असून त्याचा कुठही भेद होणार नाही, अशी सावधगिरी तुला घ्यावी लागेल. वाटेत तार्तर बंडखोर तुझा पिच्छा पुरवतील, तरी नीट सावध रहा !"

"आपलं म्हणणं माझ्या ध्यानात आलं. आपल्या सूचनेप्रमाणं वागून मी आपलं काम निश्चयानं तडीस नेईन. आपण बिनघोर असावं !"

त्याच्या करारी मुद्रेवरून व व निर्भय उद्‌गारा–वरून झारच्या मनाचे समाधान झाले. त्याने एक सील–बंद लखोटा मायकेल स्ट्रॉगॉफला देऊन म्हटले, "हा ग्रँड ड्यूकला दे !" मायकेलने मान लववून तो लखोटा झार कडून आपल्या हातात घेतला.

झारने त्याला पुन्हा बजावून सांगितले, "या लखोटयाच्या रूपाने तुझ्या मातृभूमीची अब्रू तुझ्या



हातात मी दिली आहे. ती नीट जतन करून तू स्वतःचं अन् स्वदेशाचं नाव उजळ कर. अगदी गुप्तपणानं तुला आत्ताच या कामगिरीवर जावं लागेल. तो लखोटा ग्रँड ड्यूकशिवाय दुसऱ्या कुणाच्याही हाती पडणार नाही, याबद्दल फार दक्ष रहा माझा खास राजदूत म्हणून तुझी नेमणूक मी केली आहे !"

" ईश्वराला स्मरून आपली आज्ञा मी तंतोतंत

पाळीन !" मुजरा करून मायकेल आपल्या घराकडे आला. लष्करी पोषाख उतरून त्याने एकाद्या व्यापारासारखा वेष धारण केला. आरशात त्याने स्वत:कडे निरखून पाहिले. या कपड्यात आपल्याला कोणी ओळखू शकणार नाही, याची त्याला खात्री वाटली. त्याच्या मुद्रेवर नव्या उत्साहाचा तजेला पसरला.

आपल्या कोटाच्या चोरखिशात त्याने तो गुप्त खलिता नीट बंदोबस्तानं ठेवला. कमरपट्ट्यात धार-दार पात्याचा लांब सुरा सरकविला आणि स्वसंरक्षणा-साठी म्हणून एक पिस्तूलही कोटाच्या दुसऱ्या खिशात ठेवले. वाटेत लागणाऱ्या जुजबी कपड्यांची एक पिशवी खांद्यावर टाकून मायकेल स्ट्रॉगॉफ स्टेशनकडे तडक चालू लागला. त्याने आता स्वत:ला निकोलस कॉर्पेनॉफ हे नवे नाव घेतले होते.

स्टेशनात फलाटाला लागून गाडी उभी होती. मध्यरात्र उलटून गेली होती. आसपास सारे सामसूम होते. गाडीला विशेष गर्दीही नव्हती. एका डब्यात धूर्त बातमीदार जॉलीव्हे कावळ्याच्या नजरेने प्रत्येक उतारूची हालचाल पहात बसून राहिला होता. व्यापारी वेषातला मायकेल तिकीट काढून स्टेशनात आला व डब्यात जाण्यासाठी घाईने पुढे झाला. त्याला जॉली-

व्हने पाहिले आणि त्याच्या मनात कांही संशय निर्माण झाला. मायकेल काय करतो, याकडे तो बारकाईने पाहू लागला. त्याच्या डब्यातल्या मागील बाकावर मायकेल जाऊन बसला त्याची चौकशी करावी, असे एकदा जॉलीव्हेला वाटले. पण त्यापासून कांही फायदा होणार नाही म्हणून तो गप्प बसला. इतक्यात त्याचा प्रतिस्पर्धी हॅरी ब्लाऊंट डब्यात येऊन त्याच्या शेजारी बसला व ते दोघे बातमीदार एकमेकाशी कांहीतरी कुज-बूज करू लागले.

डब्यातले इतर उतारू लढाईच्या वार्ता एकमेकाला सांगण्यात मग्न झाले होते. सभोवार भीतीचे चमत्का-रिक वातावरण पसरले होते. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर

काळजीची छाया दाटलेली होती. गाडी सुटण्याच्या सुमारास एक बावरलेली तरुणी त्या डब्यात शिरली. ती दिसण्यात अतिशय नाजूक अन् देखणी होती. भय चकित हरिणीसारखी ती इकडे तिकडे पहात एका बाका-जवळ आली. तिने आपले बोचके आपल्या दोन्ही हातात धरले होते. तिच्याकडे सर्व उतारूंच्या नजरा वळल्या ही एकटीच कुठे प्रवासाला निघाली, असे कॉर्पेनाफला वाटले. ती तेथेच एका बाकावर बिचकत बसली तिच्या शेजारी काकेशस भागातला एक गलेलठ्ठ रशियन डुलत डुलत येऊन टेकला. ती सुकुमार युवती अंग चोरून बाजूला सरकली.

गार्डने शिटी दिली अन् गाडी चालू झाली. तिच्या खडखडाटात प्रवाशांचे बोलणें अस्पष्ट झाले. डब्याच्या खिडक्यातून गार वाऱ्यांचे झोत आत येऊ लागले. कांही उतारू डोळे मिटून स्वस्थ बसले. कुणाला झोपेची गुंगी आली, तर कुणी उद्याच्या काळजीत चूर झाले. जॉलीव्हे व ब्लाऊंट मागील बाकावर बसलेल्या कॉर्पेनॉफकडे हळूच वळून पहात होते. तो आपला आरामशीर बसून राहिला होता, पण त्याची सूक्ष्मदृष्टी डब्यात काय चालले आहे, इकडे लागलेली होती.

उजव्या बाजूच्या बाकावर बसलेला तो रानवट काकेशिअस माणूस डुलक्या घेत होता. त्याचा शरीराचा भार त्या नाजूक तरुणीवर पडत होता. पण त्याची त्याला शुद्ध नव्हती. तिची अवस्था मोठी केविलवाणी झाली होती तो अगडबंब माणूस झोपेत तिच्या अंगावर कोसळला. ती भिऊन किंचाळली. तो आडदांड इसम तिच्यापासून दूर सरकेना. जॉलीव्हे व ब्लाऊंड या दुकलीने ही गोष्ट पाहिली. पण ते दोघे तटस्थपणाचे सोंग करून स्वस्थ राहिले. कॉर्पेनॉफला मात्र हा अन्याय सहन झाला नाही तो चवताळून आपल्या जागेवरून उठला.

त्या लठ्ठेश्वराचा खांदा जोराने हलवीत ती म्हणाला, " अहो जंगली महाराज, कृपा करून जरा नीट बसा ! "

" कोण मी जंगली काय ?" तो काकेशिअस रानबोका नाक फेंदारून गुरगुरला.

" जगली नाहीतर काय ? तुम्हांला कांही रीत भात आहे की नाही !"

' काय केलं मी !"

" आपल्या शेजारी बसलेल्या या तरुणीच्या अंगा-वर खुशाल तुम्ही रेटून बसताय. तुमच्या मनाला कांही वाटत नाही ?"

कॉर्पेनॉफचा आवेश पाहून तो रानदांडगा मनांत चपापला. पण मख्ख चेहरा करून तो उद्गारला, " झोपेच्या गुंगीत माझा धक्का हिला लागला असेल. तुम्हांला एवढं चिडायला काय झालं ?"

" अस्सं काय ? मग तुम्हांला एक चांगला धक्का द्यायलाच हवा !" कॉर्पेनॉफने त्याच्या कोटाची कॉलर धरून त्याला खेचले. " तुमच्या वयाला हे शोभत नाही. कॉकेशस प्रांतात बायामाणसांशी तुम्ही असंच वागता काय ?"

तो आडमुठा माणूस डोळे वटारून फुसफुसला, " दोन दिवस मला जाग्रण झालंय. माझ्या अंगाशी तुम्ही झोंबी करू नका. ही मुलगी तुमची कोण लागते?

" ती माझी बहीण आहे असं समजा. जास्त बकवा कराल तर याद राखून रहा !" कार्पेनॉफने आपली वज्रमूठ त्याच्यावर उद्गारली.

त्यासरशी तो लठ्ठंभारती नीट शुद्धीवर आला. त्या मुलीची त्याने माफी मागितली अन् कॉर्पेनाफकडे

वळून म्हणाला, “ हिला त्रास देण्याचा माझा हेतु नव्हता. तुम्ही माझ्याबद्दल गैरसमज करून घेऊ नका ” मोठ्या अदबीने त्याने एक सिगारेट कार्पेनाफला देऊ केली. त्यान नम्रतापूर्वक ती नाकारली

“ तुमच्यासारखा बेडर माणूस मला आवडतो ! सिगारेट पेटवीत तो कॉकेशियन पाहुणा म्हणाला ”

“ हे शहाणपण तुम्हाला आत्ता सुचल. त्याबद्दल मी तुमचे आभार मानतो ’ कॉर्पेनाफ आपल्या जागेवर जाऊन बसला. त्या तरुणीने त्याच्याकडे कृतज्ञतेच्या नजरेने पाहिले. त्याच्याबद्दल तिच्या मनात आपले–पणाची भावना उत्पन्न झाली.

पुढच्या बाकावर बसलेले जॉलीव्हेनि ब्लाऊंट कॉर्पेनॉफकडे सारखे वळून पाहू लागले. त्याच्याविषयी त्यांच्या मनात एक निराळीच जाणीव निर्माण झाली. जॉलीव्हे ब्लाऊंटच्या कानात कुजबुजला, “ याचा वेष नि वागणं अगदी निरनिराळं आहे.”

“ ते कसं काय ? ” ब्लाऊंटने विचारले.

“ हा दिसतोय व्यापारी पण वागतोय एकाद्या लष्करी जवानासारखा ! ”

" वेषावरून मनुष्याचा पेशा समजत नाही. सध्याचा काळ मोठा विलक्षण आहे. केव्हा कोण काय करील, याचा अंदाज लागणं कठीण आहे."

" मला वाटतं, हा एकादा गुप्त हेर किंवा राज-दूत असावा."

" तुझ्याप्रमाणं मलाही तसा संशय आला आहे. याच्यावर आपण नीट लक्ष ठेवू या "

" रात्रीच्या नाचरंगातून झार एकदम निघून का गेला, त्याचा उलगडा कदाचित आपल्याला होऊ शकेल."

" तसं झालं तर फारच छान होईल !"

जॉलीव्हेच्या मनात काय आले कुणास ठाऊक. मागे तोंड वळवून त्या अनोळखी व्यापाऱ्याला त्याने म्हटले, " कृपा करून तुमचं नांव मला कळेल का ?"

" माझ्या नावाशी तुम्हांला काय करायचंय !" मायकेल स्ट्रॉगॉफने नाखुषीने उत्तर केले.

" तुमचा निर्भयपणा खरोखर कौतुकास्पद आहे. म्हणून तुमचं नांव समजावं, असं मला सहज वाटलं."

' मला निकोलस कॉर्पोनॉफ म्हणतात. आता झालं ना तुमचं समाधान ?"

हा तरुण व्यापारी जरा तऱ्हेवाईक दिसतो, असे समजून जॉलीव्हे गप्प राहिला आणि त्याचा साथीदार ब्लाऊंट आपल्या वहीत कांहीतरी लिहिण्यात मग्न झाला.

स्वेर्डो स्टेशनात गाडी थांबली, तेव्हा चांगले उजाडले होते. स्टेशनामध्ये हमालांची धावपळ सुरू होती. आपापले सामान सुमान आवरून प्रवासी गाडी-तून खाली उतरण्याच्या घाईत होते. जिकडे तिकडे एकच गोंगाट माजला होता. येथून पुढचा प्रवास नावेतून करावयाचा होता म्हणून व्यापारी बनलेला मायकेल डब्यातून खाली उतरला त्याच्या. मागोमाग ती तरुणीही उतरली. ते दोघे वार्ताहर मायकेल कोठे जातो इकडे बारकाईने पहात होते.

स्टेशनच्या बाहेरील पटांगणात मोठी जत्रा भर–लेली. तो देखावा मोठा मजेशीर होता. रस्त्याच्या दुतर्फा नाना तऱ्हेच्या पदार्थांची, रंगीत खेळण्यांची व उंची कापडांची दुकानें मांडण्यात आली होती. खाद्य–पेयांची छोटी हॉटेल ठिकठिकाणी होती. जिकडे तिकडे पताका, फरफरे आणि रंगीबेरंगी निशाणे फडफडत होती. हौशी स्त्रीपुरुष अन् मुलेबाळे मोठ्या मजेने खातपीत सभोवार हिंडत होती. कोठे जादूचे खेळ, तर कोठे

कसरतीचे प्रयोग चालू होते. आकाशपाळण्यात बसून रहाटगाड्याप्रमाणे खालीवर गरगर फिरण्यात मुलांच्या इतकीच मोठ्यांनाहि गंमत वाटत होती. हौशी लोकांची त्या जत्रेमध्ये एकच गर्दी उसळली होती.

सर्वांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वहात होता. लोकांच्या घोळक्यामधून वाट काढत उत्सवाचा तो अपूर्व सोहळा पाहण्यात कॉर्पोनॉफ गुंग झाला होता. त्याला जॉलीव्होने अकस्मात गाठले त्याच्याशी हस्तांदोलन करून तो म्हणाला, "तुमची पुन्हा भेट झाली, याचा मला आनंद वाटतो"

"तुमचा जोडीदार कुठं दिसत नाही?" कॉर्पो–नॉफने त्याला विचारले.

"तो मुलखाचा आळशी आहे. कदाचित तो अजून डब्यातच झोपून राहिला असेल चला आपण कोठेतरी चांगले पेय घेऊ या!"

ते दोघेजण एका फराळाच्या दुकानाकडे वळले, तोंच एक हत्यारबंद घोडेस्वार भरधाव त्या जमावात घुसला. तुतारी फुंकून त्याने लोकांना इषारा दिला, "साऱ्या परदेशी प्रवाशांनी ताबडतोब येथून निघून जावे. टोम्स्क शहराला शत्रूपासून धोका उत्पन्न झाला आहे. तरी हुषारीने रहा!"

त्या बरोबर साऱ्या लोकांचे धावे दणाणले. झाडावर बसलेल्या पाखरांच्या थव्यावर उनाड मुलाने धोंडा फेकताच ती पाखरे वाटा वाटांनी उडून जातात, तशीच अवस्था तेथे जमलेल्या हजारो यात्रेकरूंची झाली. सगळीकडे एकच कालवा उसळला !

आपला जीव वाचविण्यासाठी प्रत्येकाची धडपड सुरु झाली नदीच्या काठावर लोकांची तोबा गर्दी उडाली. तेथील बंदरात एक जहाज उभे होते. कॉर्पोनॉफ चपळाई करुन जहाजावर चढला त्याच्या पाठोपाठ जॉलीव्हे अन् ब्लाऊंटही जहाजात आलेले त्याला दिसले. नदी किनाऱ्यावर एक निराधार तरुणी रडत बसल्याचे त्याला कुणीतरी सांगितले. तसा तो मनात चमकला. जॉलीव्हेल आपली जागा धरण्यास सांगून कॉर्पोनॉफ बंदरावरच्या पासपोर्ट देणाऱ्या कचेरीपाशी धांवत आला. तेथे एका बाजूला कपाळाला हात लावून बसलेली एक तरुणी त्याला दिसली कॉर्पोनॉफने चटकन् तिला ओळ-खले. ती स्फुंदत म्हणाली, "मी मोठ्या संकटात आहे मला जहाजात प्रवेश मिळण्यासाठी पास हवाय. तो या कचेरीत मला कुणी देत नाही.'

"थांब, तूं चिंता करू नकोस. मी त्याची कांहीतरी तजवीज करतो." तो पटकन् त्या कचेरीत गेला व तेथील

अधिकाऱ्याला आपली ओळख पटवून त्या तरुण मुलीसाठी त्याने प्रवासाची परवानगी मिळवली. तिने कॉर्पोनॉफला मनःपूर्वक धन्यवाद दिले.

तिने आपली माहिती त्याला सांगितली तिचे नांव होते नादिया केडॉर. इर्कुटस्कला तिचे वडील रहात होते. त्यांना भेटायला ती निघाली होती. कॉर्पोनॉफने तिला सहाय्य करण्याचे आश्वासन दिले. तो तिला म्हणाला, "मलाही तिकडंच जायचं आहे या प्रवासात आपण भावाबहिणीप्रमाणं वागायचं. म्हणजे कुणालाही आपला संशय येणार नाही !" तिने हसतमुखाने त्याच्या सूचनेला संमती दिली. तिचा हात धरुन तो जलदीने जहाजात चढला.

त्याचवेळी धूर्त जॉलीव्हे ब्लाऊंटला हसत सांगत होता. " सरहद्द ओलांडून जाताच आपण लढाईच्या प्रदेशात शिरू. मित्रा, आपण दोघेही जोडीनं बातम्या काढण्याचं काम करूंया. त्यानंतर आपला पंथ निराळा ! "

त्याचा हात दाबून ब्लाऊंट म्हणाला, "कांही हरकत नाही मात्र त्या तरुण व्यापाऱ्याकडं तुझं ध्यान असू दे डब्यात भेटलेल्या तरुणीला घेऊन तो तिथं उभा आहे पहा !"

३. अस्वलाशी झुंज

त्या जहाजाचे नाव होते कॉकेशस. अन् ते टोबोल नदीच्या प्रवाहातून चालले होते. जहाजावर अनेक देशातल्या उतारूंची गर्दी झाली होती. हवा ढगाळ होती अन् सर्वांच्या चेहऱ्यांवर गूढ उदासीनता पसरलेली होती. त्या जहाजावर परदेशी व्यापारांचा बराच भरणा होता. आर्मीनिअन लोकांच्या अंगावर लांब झगे होते, ज्यू लोकांच्या डोक्यावर शंकूच्या आकाराच्या उंच टोप्या होत्या व तुर्क व्यापाऱ्यांनी जरतारी पागोटी आपल्या डोक्यावर घातली होती यातील बहुतेक प्रवाशांना किरगीझ भागातील आपल्या गावाकडे जायचे होते.

कॉर्पेनॉफ घारीच्या नजरेने सर्व जहाजावर टेहेळणी करीत सावकाश फिरत होता. आघाडीवरील चकमकींची कांहिही बातमी आपल्यास कळेल असा त्याचा अंदाज होता

त्याचबरोबर आपल्यावर ही कुणाची तरी पाळत असणार ही शंका त्याला वाटत होती. म्हणून तो फार सावधगिरीने जहाजाच्या डेकवर फिरत होता. उतारूंचे एक टोळके जहाजाच्या कठड्यापाशी उभे राहून गप्पा गोष्टी करण्यात गर्क झाले होते.

तेथेच कडेला तुर्की पेहराव केलेली एक नखरेल स्त्री चंचल दृष्टीने सभोवार कुणाला तरी शोधीत उभी होती. जहाजावरील इतर बायकांच्या पेक्षा तिचा थाटमाट कांही निराळा होता. ती फार देखण तर होतीच, पण त्यापेक्षा तिचे एकंदर हावभाव कुणालाहि भुरळ घालणारे होते. तिच्या चर्येवर कोल्ह्याचा कावेबाजपणा अन् डोळ्यात लांडग्याचा खुनशीपणा एकवटलेला होता. ही चवचाल बया शत्रूपक्षाकडील गुप्तहेर तर नसेल, असा संशय कॉर्पेनॉफला आला. हिच्यापासून आपणाला कदाचित धोका होण्याचा संभव आहे, असे कॉर्पेनॉफला तिला पाहताक्षणीच वाटले. तिच्या हालचालीकडे नजर ठेवण्याचा त्याने मनाशी बेत केला. तेवढ्यात ती चटक चांदणी ठुमकत त्याच्या पुढून झरकन् निघून गेली.

डेकवरच्या एका केबीन जवळून कॉर्पोनॉफ हलक्या पावलांनी चालला असताना, "अग सँगरी, जरा इकडे ये" अशी हाक एका वृद्ध बाईने कुणाला तरी मारल.

कॉर्पोनॉफने त्या बाजूला नजर फिरवली. तिकडील एका कोपऱ्यात ती मघाची नटरंगी नार तुरुतुरु चालत गेली. कॉर्पोनॉफ एका फळीआड लपून त्यांचे संभाषण ऐकू लागला. ती म्हातारी स्त्री त्या छबेलीला सांगत होती, " झारचा खास राजदूत इर्कुटस्कला चाललाय म्हणे. तूं त्याचा तपास कर ! "

ती छबकडी तिला म्हणाली, " मलाही तसाच संशय आलाय. मी त्याच्या मागावर आहेच. तूं काळजी करू नकोस."

कॉर्पोनॉफ तेथून झटकन् बाजूला झाला. त्या दोघी माझ्या बद्दलच बोलत आहेत. पण मी इकडे आल्याचा सुगावा त्यांना कसा लागला, हे मोठेच आश्चर्य त्याला वाटले. जिला तो शत्रूपक्षाकडील हेर समजला होता, तिचे नांव 'सँगरी' आहे, हे त्याला आपोआप कळून चुकले. झारचा कट्टा दुष्मन इव्हॅन ओगॅरेफ त्याची ही साथीदारीण असली पाहिजे, असा त्याने आपल्यां मनाशी तर्क केला. या जहाजावर शत्रूचे आणखी हेर असले पाहिजेत, याबद्दल त्याला संशय उरला नाही. आपले काम किती अवघड आहे, याची त्याला पूर्ण कल्पना आली.

कॉकेशस जहाज बंदरात येऊन लागले. सूर्य नुकताच मावळला होता आकाशात ढगांची दाटी झाली असल्यामुळे चोहीकडे धूसर छाया पसरल्या होत्या. सारे वातावरण कुंद भासत होते जहाजातून किनाऱ्या-वर उतरण्यासाठी उतारूंची गडबड सुरू झाली. नादियाला घेऊन कॉर्पोनॉफ धक्क्यावर उतरला. त्याची दृष्टी सहज बाजूला वळली. ती फटाकडी सँगरी आपल्याकडे संशयित नजरेने रोखून पहात उभी असल्याचे कॉर्पोनॉफच्या ध्यानात आले आणि तो मनात चमकला. हिच्यापासून स्वतःला फार मोठा धोका आहे, याबद्दल त्याची बालंबाल खात्री झाली !

आपण तिला पाहिलेच नाही असे भासवून व नादियाचा हात धरून कार्पोनक तेथून बाहेर सटकला. त्याचा पुढील प्रवास फार बिकट अन् डोंगराळ मुलखांतून होता. कोठे एकादे वाहन मिळते का याचा शोध तो घेऊ लागला एका झाडाखाली एक बगी उभी होती. तिचा कोचमन मुस्कीलपणानें हसत त्याला बोलला, तुम्ही दोघ मधुचंद्राला चाललेले दिसता. ही गावठी “ गाडी तुम्हाला चालेल का पहा ! ”

हा आपणाला नवराबायको समजला, या कल्पनेने नादीया मनांत ओशाळली. त्याच्या आगाऊपणाचा

कार्पोनाकला राग आला. पण ही वेळ भांडण काढण्याची नव्हती. बादशहाच्या खलित्याप्रमाणेच नादियाच्या रक्षणाची जबाबदारी आता त्याच्यावर येऊन पडली होती. दिशा अंधेरून आल्या होत्या. वादळाची पूर्व चिन्हे आकाशात दिसू लागली मेघांचा गडगडाट सुरू होऊन विजाही चमकू लागल्या. मिळेल ते वाहन घेऊन तो बिकट रस्ता ओलांडून जाणे महत्वाचे होते

नादियासह घाईने त्या बगीत बसून कार्पोनाफने कोचमनला ' चलो ' असा इषारा केला. रस्ता फार अरुंद अन् घाटातून होता. थोड्याच वेळात जोराचा वारा सुटला अन् पर्जन्यवृष्टीला सुरवात झाली कपटी शत्रूप्रमाणे निसर्गही कार्पोनाफला त्रास देण्यास सरसावून आला. वादळाचे भीषण थैमान सुरू झाले डोंगराळ भागातून गाडी पुढे जाणे अशक्य भासू लागले. एक बाजूला उंच दरड होती, तर दुसऱ्या बाजूला खोल दरी पसरलेली होती. केव्हा काय अपघात होईल याचा नेम नव्हता. काळेभोर आभाळ एकाद्या क्रूर अस्वलासारखे गुरगुरत होते !

जोराच्या वृष्टीमुळें डोंगरातून पाण्याचे लोंढ वेगाने वाहू लागले. तशात डावीकडच्या दरडीवरून मोठ-

मोठाल्या शिला घसरून खाली पडू लागल्या. गाडी-सकट आपला कपाळमोक्ष होणार, या भीतीने गाडीवान मनात गांगरून गेला. तेवढ्यात दोन तीन भले मोठे दगड गाडीच्या पुढेच घरंगळत येऊन पडले. पुढे जाणे किंवा मागे फिरणे आता शक्य नव्हते. वाटेतले प्रचंड फत्तर उचलून बाजूला करणेही माणसाच्या शक्ती बाहेरचे होते. दगडांच्या ढिगाऱ्यातून गाडी उचलून वर काढली तरच पुढचा प्रवास चालू होणार होता नाही-तर दगडांच्या वर्षावाने आपला चेंदामेंदा होणार, म्हणून गाडीवान तळमळू लागला.

कॉर्पोनॉफला आपण कोणत्या भयंकर अडचणीत सापडलो आहोत, याची स्पष्ट जाणीव झाली. तथापि तो थोडासुद्धा डगमगला नाही. त्याची छाती वज्राची अन् बाहू पोलादाचे होते. तो खरा हिंमतवान् होता. त्या घाबरलेल्या गाडीवाल्याला त्याने धीर दिला त्याच्या डोळ्यात विलक्षण तेज चमकले अन् त्याच्या अंगात अद्भूत सामर्थ्याचा संचार झाला.

गाडीतून तो पटकन् खाली उतरला. वाटेत पडलेल्या शिळांच्या आकाराचा अंदाज घेतला. पुढे होऊन घोड्यांचा लगाम नीट धरण्यास त्या कोचमनला त्य ने सांगितले अन् आपण स्वतः गाडी मागील बाजूस

क्रमांक .... नोंद दि. 29/12/68

गेला. आपल्या बळकट हातांनी त्याने ती गाडी मागील बाजुकडून अलगत वर उचलली अन् दगडांच्या राशीतून

बाहेर काढली त्याची ती अचाट ताकद पाहून नादिया मनात थक्क झाली अन् असा बलशाली पुरुष आपला साहचकर्ता आहे, याचा तिला मोठा अभिमान वाटला.

त्या कोचमनलाही नवा उत्साह आला अन् त्याने आपली गाडी पुढे हाकारली. एका वळणापाशी पुन्हा तिची वाट रोखली गेली. कोणीतरी मदतीसाठी हाका मारीत असल्याचा कॉर्पोनॉफला भास झाला नादियाला त्याने गाडीतून खाली उतरण्यास सांगितले. गाडीवाना-कडून एक कंदील घेऊन त्या आवाजाच्या रोखाने तो पुढे गेला तेथे एक बगी अडकून पडली होती व तिचे दोन्ही घोडे दगडांच्या वृष्टीने जायबंदी झाले होते जवळच बाजूला ते दोन वार्ताहर कपाळाला हात लावून बसले होते.

कॉर्पोनॉफने त्यांना चटकन ओळखले. त्यांना हाताला धरून उठवीत तो म्हणाला, " मित्रांनो, असे निराश होऊ नका. या वादळात इथं असं बसून निभाव-णार नाही. उठा, जलदी करा. माझ्या गाडीचा एक घोडा मी तुम्हाला देतो. "

जॉलीव्हेला धीर येऊन त्याची मुद्रा पुन्हा टवटवीत झाली. कॉर्पोनॉफचे मनःपूर्वक आभार मानून तो म्हणाला, " तुझ्या सारखा थोर मनाचा माणूस मी आजच पाहिला. इतर व्यापाऱ्यांच्या पेक्षा तूं फार निराळा आहेस. "

"संकटात एकमेकाला मदत करणं हे माणसाचं कर्तव्यच आहे. चला, इथं आपल्याला थांबून भागणार नाही," असे बोलून कॉर्पोनॉफ आपल्या गाडीकडे परतला. पण त्याला नादिया तेथे कुठे दिसेना. कॉर्पोनॉफ मनातून फारच घाबरला. डोळे फाडून तो सभोवार पाहू लागला. इतक्यात 'धावा हो धावा' अशी किंकाळी अन् त्या पाठोपाठ पिस्तुलाचा बारही त्याला ऐकू आला !

नादिया भीषण संकटात सांपडली असल्याची कल्पना होऊन कॉर्पोनॉफ विजेच्या वेगाने त्या बाजूला धावत सुटला. समोरचे दृश्य पाहून त्याच्या काळजाचा थरकांप उडाला. एक अतिशय भयंकर पहाडी अस्वल मागील पायावर उभे राहून थयथय नाचत पुढे येत होते. आपले दोन्ही पंजे उगारून ते गुरगुरत होते. त्याच्या जबड्यातले तीक्ष्ण सुळे चमकत असून त्यातून त्याची लाल जीभ सारखी लळलळत होती. त्याचे डोळे पेटलेल्या निखाऱ्या–सारखे तांबडेलाल भासत होते. भेदरलेली नादिया त्याच्या पंजात आपण सांपडू, या भीतीने घाबरून किंचाळत होती. ते प्रचंड अस्वल गुरगुराट करीत तिच्यावर झेप टाकण्या–साठी सज्ज झाले होते. तिच्या डोळ्यापुढे अंधेरी येऊन तिच्या हातातले पिस्तूल गळून खाली पडले.

तेव्हढ्यात कॉर्पोनॉफ तेथे पळत गेला. आपल्या कमरबंदातील धारदार सुरा त्याने चटकन् बाहेर काढला. पुढे होऊन त्याने घाबरलेल्या नादियाला डाव्या हाताने बाजूला केली अन् तो स्वत: त्या राक्षसी अस्वलाशी झुंज घेण्यास सिद्ध झाला. ते दोन्ही वार्ताहर तेवढ्यात तेथे धडपडत आले अन् तो देखावा पाहून त्यांच्या अंगाला कंप सुटला.

ते जाडजूड नि केसाळ अस्वल आपला भेसूर जबडा पसरून नाक फेंदारून, दात विचकत आणि थयथयाट करत कॉर्पोनॉफच्या अंगावर चालून गेले दुसरा एखादा सामान्य माणूस त्या हिंस्त्र पशूला पाहूनच थंडगार झाला असता ! पण कॉर्पोनॉफ हा असामान्य धैर्याचा वीर पुरुष होता. ते अस्वल आपली तीक्ष्ण नखे परजून अन् कर्ण-कर्कश आरोळ्या मारीत त्याला भीती दाखवू लागले पण बहाद्दर कॉर्पोनॉफ तिळभरही मनात कचरला नाही.

नीट पवित्रा घेऊन नि उजव्या हातात सुरा घट्ट धरून त्या क्रूर जनावराच्या पुढे कॉर्पेनॉफ उभा राहिला. भयंकर गर्जना करून अस्वलाने त्याच्यावर उडी घेतली. त्याची उडी आपल्या अंगावर पडण्यापूर्वीच कॉर्पोनॉफने बरोबर नेम साधून आपला सुरा त्याच्या काळजात जोराने खुपसला. त्यासरशी ते अस्वल वेदनेने किंचाळत जमि-

नीवर धाडकन् कोसळले ! नादियाने देहभान विसरून कॉर्पोनॉफला एकदम मिठी मारली. जॉलीव्हे व ब्लाऊंट आश्चर्याने अगदी थक्क झाले. केवळ सुऱ्याने प्रचंड अस्वलाला ठार करणारा असा बहाद्दर वीर त्यांनी यापूर्वी कधीही पाहिला नव्हता. त्या दोघांनी पुढे येऊन कॉर्पोनॉफला शाबासकी दिली !

धूर्तपणाने इंग्रज बातमीदार ब्लाऊंट म्हणाला, "व्यापाऱ्याच्या ठिकाणी एवढं धाडस बहुतेक नसतं आमचा अंदाज सहसा चुकणार नाही "

" कसला अंदाज ? " कॉर्पोनॉफने चमकून विचारले.

" तू कोणीतरी लष्करात काम करणारा बहाद्दूर शिपाई किंवा —"

" थांबलास का, पुढं बोल ना ! "

" झारचा धाडसी राजदूत असावास. तो मायकेल स्ट्रॉगॉफ तू नव्हेस ना ! " एवढे बोलून बेरकी ब्लाऊंट हसला अन् त्याच्या म्हणण्याला जॉलीव्हेनेही साथ दिली.

या चोरानी आपणाला नेमके ओळखले म्हणून मायकेल मनात चपापला. तो त्यांना आपलेपणाच्या भावनेने म्हणाला, " तुम्ही दोघं खरोखर फार धोरणी आहात. माझ्यावर मेहेरबानी करा अन् माझं हे रहस्य गुप्तच ठेवा. नाहीतर माझ्याबरोबर तुमचाही घात होईल ! मी निकोलस कॉर्पेनाफ नावाचा व्यापारी आहे, हे नीट लक्षात ठेवा.

" तूं आमचा हितकर्ता आहेस. आम्ही तुला

कधीही दगा देणार नाही. तूं मुळीच घाबरू नकोस.'' त्याची पाठ थोपटून जॉलीव्हेने त्याला अभिवचन दिले.

नंतर त्यांनी घोडे जुंपून आपापल्या गाड्या तेथून बाहेर काढल्या त्या वार्ताहरांच्या गाडी मागून कॉर्पो–नॉफची गाडी धावत होती. सैबेरीअन हद्दीवरून त्यांच्या गाड्या किरगीझ पठारावर आल्या. आता रस्ता सरळ अन् बिनधोक होता. आपल्यापुढे आणखी कुणाची तरी घोडागाडी भरधाव दौडत असल्याचे त्यांना दिसले. तीमध्यें आपले प्रतिस्पर्धी कदाचित असतील, त्यांच्या आधी मुक्कामावर आपण पोचले पाहिजे नाहीतर आपला सारा डाव उधळेल, म्हणून कॉर्पोनॉफने नादियाला नीट सावरून बसण्याची सूचना दिली व आपली गाडी बेफाम वेगाने सोडली.

वार्ताहरांच्या गाडीला मागे टाकून कॉर्पोनॉफचे घोडे पुढे पळत असलेल्या त्या गाडीजवळ आले. तिचा चाबूकस्वारही ईर्षेला पेटला. त्या दोन्ही गाड्यांची, ' पुढे कोण जातो ' याबद्दल चुरशीची शर्यतच सुरू झाली. पण कॉर्पोनॉफची जिद्द फार जबरदस्त होती. त्याने झपाट्याने आपली गाडी पुढे नेली. तसा तो चाबूकस्वार चिडला अन् कार्पोनाफला शिव्या देऊ लागला. पण त्याची गाडी केव्हाच दृष्टीच्या टप्प्याबाहेर गेली होती.

मुक्कामाच्या जागेवर प्रथम कॉर्पोनाफ पोचला तेथील सराईच्या आवारात त्याने आपली गाडी उभी केली घोडयांच्या पाठीवरून हात फिरवून त्यांना प्रेमाने थोपटले. कोचमनला विश्वासात घेऊन त्याला चांगली बक्षिसी दिली. मात्र गाडी तशीच जुंपलेली राहू दिली. नादियाला घेऊन तो आत गेला व खानावळ-वाल्याकडून खाद्य पदार्थ मागविले. त्या दोघांनी आपली भूक भागविली अन् पुढच्या प्रवासाची लागलीच तयारी केली.

तोच खवळलेला चाबूकस्वार पाय आपटत आत शिरला. "बाहेर अंगणात कुणाची गाडी उभी आहे ?" त्याने कॉर्पोनॉफला दरडावून विचारले.

"माझी !' कॉर्पोनॉफने तितक्यात ताठरपणाने उत्तर दिले

"माझ्याशी द्वंद्वयुद्धाला तयार हो. तुझी हिंमत मला बघायची आहे"

"हा झगडा मला मंजूर नाही."

"ते कांही चालायचं नाही. मी तुला तसा सोड-णार नाही !" तो चाबूकस्वार त्याच्या अंगावर धावून गेला. कॉर्पोनॉफ तसाच पुतळ्यासारखा निश्चल उभा

राहिला. ते पाहून त्या इसमाने त्याला चाबकाचा फटकारा मारला तरी ही कॉर्पोनॉफ अगदी शांत राहिला. त्या स्थितीत त्याला पाहून ते दोघे वार्ताहर चकीत झाले. ते आपल्या मनाशी म्हणाले, " अस्वलाला ठार करणारा हा मर्द गडी या गाडीवाल्यापुढं असा नेभळट का बनलाय ? "

कॉर्पोनॉफला प्रथम आपली कामगिरी पार पाडा-वयाची होती. त्या मग्रूर चाबूकस्वाराशी हमरीतुमरी करण्यात निष्कारण वेळ मोडला असता व त्याचे गुपित फुटले असते. म्हणून तूर्त अपमान सोसण्याचे त्याने ठरविले अन् तेच बरोबर होते. त्याचा कमालीचा शांत-पणा पाहून तो चाबूकस्वारही मनात वरमला व तेथून बाहेर गेला.

नादियाला बरोबर घेऊन कॉर्पोनॉफने आपला पुढचा प्रवास पुन्हा सुरू केला. इर्टीश नदीच्या काठावर तो येऊन पोचला. नदीला मोठा पूर आला होता अन् पलीकडे जाणे फार अवघड झाले. त्याच्या मागोमाग तो चाबूकस्वार अन् ते दोघे वार्ताहर तेथे येऊन थडकले. त्या चाबूकस्वाराला झारचा राजदूत इकडे येत अस-

त्याची कुणकुण लागली होती. खानावळीत आपण तडाखा हाणलेला तो तरणाबांड व्यापारी बहुतेक राज-दूतच असावा, अशी त्याला दाट शंका आली. त्याला आपण फुकट हातचा घालवला, याबद्दल त्याच्या मनाला चुटपूट लागली. तो पुन्हा कोठे आढळला तर त्याला पकडण्याचा त्याने निश्चय केला. तो राजद्रोही इव्हॅन ओगॅरेफचा हस्तक होता !

कॉर्पोनॉफने मोठे बक्षीस देऊन तेथील कोळ्यांना वश करुन घेतले व तराफ्यावर आपली गाडी चढविली. प्रवाहातून तो तराफा सावकाश पैलतीराकडे निघाला. इतक्यात एक कोळी घाबरून ओरडला, "आपण ठार बुडालो. ते क्रूर तार्तर नावेतून आपल्याकडं येत आहेत !"

तराफ्यावर रानटी तार्तरांनी हल्ला चढविला. कांही कोळी जखमी झाले व खुद्द कॉर्पोनॉफला भाल्याचा घाव बसून तो नदीच्या पात्रात कोसळला. नादियाने मोठ्या दुःखाने टाहो फोडला ! तार्तरांनी तो तराफा आपल्या कबजात घेतला. नादियाने केलेला प्रतिकार फुकट गेला. त्या टोळीच्या म्होरक्याने तिला पकडून आपल्या राहुटीकडे नेले.

कॉर्पोनॉफ पाण्यात पडला, पण तो चांगला पोहणारा होता. पाण्यावर आपले डोके न दाखवता तो झरझर पोहत पैलतीराला जाऊन पोचला. पण भाल्याच्या जखमेने आणि अतिशय श्रमाने त्याला तेथेच ग्लानी आली व तो काठावरील गवतामध्ये तसाच पडून राहिला. आपल्या-भोवती काय घडत आहे, याची त्याला शुद्ध उरली नव्हती.

—०—

४. काळाच्या जबड्यात

कॉर्पोनॉफ शुद्धीवर आला तेव्हां आपण कोठे आहोत हे त्याला समजेना. एक वृद्ध संन्यासी त्याच्या खाटेपाशी बसून होता. डोळे उघडल्यावर कांही वेळाने त्याला एकेक प्रसंग आठवू लागला. आपण नदीच्या पैल-तीरावर पोहचल्यानंतर तेथेच थकून आडवे झालो, याचे त्याला स्मरण झाले. मान किंचित् उचलून त्याने त्या वृद्धाला विचारले, "तुम्ही कोण अन् मी इथं कसा आलो ?"

वृद्ध संन्याशाने सांगितले कीं, 'या झोपडीत मीच तुला घेऊन आलो. नदी काठच्या गवतात तूं बेशुद्ध होऊन पडला होतास. तुझ्या खांद्याला भाल्याची जखम झाली होती. वनस्पतीचा लेप देऊन मी ती चांगली बांधली. तुला आता कसलेच भय नाही. माझ्या झोपडीत तूं त[ी]न दिवस आहेस."

कॉर्पानॉफने हळूच उठून त्याचे पाय धरले. ' साईज, तुम्ही मला देवासारखे भेटलात. तुमचे उपकार मी जन्मभर विसरणार नाही. ' हे गाव कोणते आहे ?'

" हे ओम्स्क आहे सध्या येथे लुटारू तार्तरांचा अंमल आहे. तूं रशियन तरुण दिसतोस !"

" होय बाबा, मी एका महत्वाच्या कामगिरीवर निघालोय. मला इथून लौकर पुढं जायला हव."

पण तू एकटा कसा जाणार ? त्या रानटी लोकां–पासून तुझ्या जिवाला अपाय होईल !"

कॉर्पोनॉफला एकदम नादियाची आठवण झाली. गेल्या तीन दिवसात तिची काय अवस्था झाली असेल, या चिंतेने त्याला घेरले. त्या वृद्ध संन्याशाला तो म्हणाला, 'कांही झालं तरी इथून मला पुढं गेलंच पाहिजे !'

क्षणभर विचार करुन तो संन्यासी म्हणाला, "तुला शत्रूच्या मुलखात एकटा जाऊ देणे मला प्रशस्त वाटत नाही. मी तुझ्याबरोबर येऊ का ?"

कॉर्पोनॉफला त्या अनोळखी प्रांतात कुणाची सोबत मिळाल्यास हवी होती. त्याने त्या वृद्ध बुवाच्या म्हण–ण्याला संमती दिली. ते दोघेजण मिळून तेथून टोम्स्कच्या दिशेने निघाले. तीन दिवस प्रवास केल्यानंतर ते दोघे त्या शहराच्या वेशीपाशी आले. तेथे पहाऱ्यावर एक सशस्त्र तुर्क शिपाई खडा होता. इतक्यात भरधाव घोडा फेकत रुबाबदार शिलेदार वेशीतून आत गेला. त्या पहारेकऱ्याने वाकून त्याला सलाम केला. वृद्ध संन्यासी कॉर्पोनॉफच्या कानात कुजबुजला. "हाच तो राजद्रोही इव्हॅन ओगॅरैफ ! तुर्कांच्या अमीराशी याने संगनमत केले आहे "

कॉर्पोनॉफने मुठी वळून रागाने दांत ओठ खात त्या दौडत गेलेल्या घोडेस्वाराकडे पाहिले. गावात लुटारूंनी

दंगल माजविली होती. भेदरलेला लोकांचा जमाव बचावाकरता सरकारी तारकचेरीकडे वळला. तेथील बंदोबस्त बऱ्यापैकी होता. कॉर्पोनॉफ त्या संन्याशासह पोस्तच्या इमारतीत घाईने शिरला. तेथील दालनात कांही स्त्रिया व पुरुष खिन्न मुद्रा करुन बसले होते. त्यापैकी एक म्हातारी एकदम उठून उभी राहिली. "अरे मायकेल, इकडं ये पाहू !" असे म्हणत कॉर्पो–नॉफकडे ती गडबडीने आली.

तिच्या आवाजावरुन ती आपली वृद्ध आई असल्याचे त्याने तत्काळ ओळखले. त्याच्यापुढे मोठाच पेचप्रसंग उभा राहिला. आईला भेटावे तर देशकार्यात विघ्न येईल अन् भेटू नये तर तिच्या हृदयाला केवढा धक्का बसेल, या कल्पनेने त्याचा जीव कासावीस झाला.

झारचे शब्द त्याच्या कानांत घुमू लागले. मातृ-प्रेम कीं देशप्रेम, हे द्वंद्व त्याच्या मनात उभे राहिले. शेवटी त्याने निश्चय केला की, कांही झाले तरी या-वेळी आपण आपल्या कर्तव्यालाच जागले पाहिजे! ती म्हातारी बाई त्याच्या तोंडाकडे व्याकुळ दृष्टीनें पहात म्हणाली, "माझ्या लाडक्या बाळा, तूं माझ्याशी बोलत का नाहीस ?'

डोळ्यांत दाटणारे अश्रु आवरून कॉर्पोनॉफ उग्दारला, आजीबाई, तुमचा कांहीतरी गैरसमज झालाय. मी तुमचा कोणी नव्हे !, तिच्याकडे पाठ फिरवून तो त्या हॉलच्या बाहेर निघाला. त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहून ती म्हातारी हुंदके देऊ लागली

हा प्रकार तेथील एका शत्रूपक्षीय मनुष्याने पाहिला मघाचा तो चाबूकस्वार त्या सुमारास तेथे आला. त्याला ही बातमी त्या मनुष्याने सांगितली. तो चटकन् त्या म्हातारीकडे वळला. तो तिला ओळखत होता.

त्याने तिला विचारले, "मार्फा, तूं अशी का शोक करीत आहेस ?"

तिने दचकून मान वर केली. त्याची संशयी दृष्टी पाहताच तिला कसलेतरी भय वाटले. ती डोळे पुसत म्हणाली, "माझ्या डोळ्यात कुसळ गेले म्हणून माझा जीव घाबरा झाला. माझे डोळे त्यामुळं चुरचुरत आहेत. मी कशाचा शोक करणार !"

"अस्सं काय? 'मायकेल' म्हणून मघाशी तूं कुणाला हाक मारलीस ?"

"मला तसा भास झाला. पण तो माझा मुलगा नव्हता."

"तूं साफ खोटं बोलतेस. खरं सांग, तो कोण होता ?"

"खरंच तो मायकेल नव्हता. म्हातारपणामुळं माझी दृष्टी अधू झालीय. मला तसा उगीच भ्रम झाला.'

"तूं अशी ऐकायची नाहीस. अंधार कोठडी तुला दाखवली म्हणजे तुझे डोळे उघडतील.' तिचा दंड पकडून त्याने तिला बाहेर काढली आणि तेथून जवळच असलेल्या इव्हॅन ओगॅरेफच्या छावणीकडे तिला ओढत नेली.

ओगॅरेफ लाल डोळे करुन तिच्यावर खेकसला. “थेरडे, खरं बोल. तुझा मुलगा मायकेल इथ आलाय की नाही ?”

“मी अगदी खर सांगते. माझा मुलगा इथ आलेला नाही. ”

‘मग तू तार कचेरीत ‘मायकेल’ म्हणून कुणाला बोलावलंस ?”

“तो एक सैबेरीयन तरुण होता. त्याचा चेहरा मला मायकेल सारखा दिसला. मला अलीकडं नीट दिसत नाही तो खराच माझा मुलगा असता, तर मी त्याला सोडला असता कां? तुम्हीच विचार करा बरं !”

तिच्या त्या जवाबाने ओगँरेफचा संशय फिटला नाही. त्याने तिला पुन्हा धमकी दिली. ‘माफॉ, खरं काय ते सांग. नाहीतर हंटरनं तुझ्या अंगाची चामडी लोळवीन !”

“मी तुम्हाला खरी हकीकत सांगितली. मला म्हातारीला उगाच का छळता बरं !” माफॉने तळमळून हात जोडले.

“ म्हातारडे, तुझ्या सोंगाला मी फसणार नाही. तूं अन् तुझा मुलगा माझ्या पकडीतून आता खास सुटत

नाही !" त्याने आपल्या शिपायांना हुकुम केला. "या चेटकीणीच्या मुसक्या बांधून हिला आपल्या छावणीकडं घेऊन चला !"

तारकचेरीतून कॉर्पोनॉफ त्वरेने बाहेर पडला. आपल्या गाडीचा घोडा घेऊन तो त्याच्यावर स्वार झाला अन् त्याने तेथून पुढे दौड मारली. तुर्क व तार्तर लुटारुंनी उध्वस्त केलेली अनेक खेडी त्याने वाटेत पाहिली. एका खेडे गावात तो विश्रांतीसाठी थांबला. तेथील झोपडीच्या बाहेर कांही बायका व मुले दुःखीकष्टी झालेली त्याला दिसली. त्यांच्याकडून त्याला समजले की, शत्रूच्या शिपायांनी आसपासच्या भागात भयंकर धुमाकूळ मांडला आहे.

तेथून कांही अंतरावर तो गेला असतांना त्याच्या मनात अचानक कांहीतरी शंका आली. घोड्यावरुन त्याने जमिनीला कान लावला. लांबून घोड्यांच्या टा–पांचा आवाज त्याला ऐकू आला. चटकन् बाजूच्या झाडांमध्ये तो लपून बसला. थोड्याच वेळात स्वारांची एक तुकडी कुणाला तरी धुंडीत चाललेली त्याला दिसली. कांही स्वार घोड्यांवरुन खाली उतरले. आपण वेढलो गेलो असल्याची जाणीव कॉर्पोनॉफला झाली. तो लपून

बसलेल्या जागेपलीकडे दोन स्वार एकमेकाला सांगत होते ' झाराचा तो राजदूत आपल्याला चुकवून फार लांब गेला नसेल. त्याची म्हातारी आई कर्नल इव्हॅन ओगॅरेफच्या ताब्यात सापडली आहे. तो तिच्याकडून आपल्या मुलाचा ठावठिकाणा खासच समजून घेईल! आपले गुपित दुष्मनाला समजले असून, आपली'

आई ही त्याच्या कचाटयात सापडल्याचे वृत्त अशा रीतीने कळून येताच कॉर्पोनॉफचा जीव कासावीस झाला. नादियालाही शत्रूने पकडले असले पाहिजे, याबद्दल त्याला संशय उरला नाही. आपली देखील आता तीच अवस्था होणार, म्हणून तो फार खिन्न झाला. बरेचसे स्वार इकडे तिकडे पांगलेले दिसताच त्याने धाडस करावयाचे ठरविले. देवाचे नाव घेऊन त्याने आपल्या घोड्याला टाच मारली अन् वाऱ्याच्या वेगाने त्या स्वारांची कोंडी फोडून तो भरधाव निघाला. 'सावधान' असे ओरडून ओगॅरेफने त्याच्या रोखाने पिस्तुल झाडले.

"अरे, तो बदमाश पळून चाललाय. पकडा त्याला!" असा एकच गिल्ला होऊन शत्रूचे कांही घोडेस्वार त्यांचा पाठलाग करू लागले. कॉर्पोनॉफच्या पुढे नवे संकट खडे झाले. त्याच्या वाटेत नदी आडवी आली. त्याचा घोडा थकलेला होता. मागून शत्रूचे

शिपाई त्याच्यावर गोळ्या झाडीत होते. कॉर्पोनॉफने बेधडक नदीच्या प्रवाहात घोडा घातला. कॉर्पोनॉफ मोठ्या मुष्कीलीनें पलीकडे पोचला. पण त्याचा इमानी घोडा झालेल्या जखमांमुळे काठावर मरून पडला !

कॉर्पोनॉफच्या डोळ्यात अश्रू गोळा झाले. त्याने त्या मृत सोबत्याच्या तोंडावरुन प्रेमाने हात फिरवला अन् तेथून तो झपाट्याने शेजारच्या गावाकडे पळत गेला. तेथल्या तारकचेरीत त्याने आश्रय घेतला, कांही

बातमीदार तेथे जमून आपल्या वृत्तपत्रांना संदेश पाठ–वीत होते. त्यामध्ये जॉलीव्हे अन् ब्लाऊंटही त्याला तेथे आढळेल.

तो त्यांना कांही विचारणार इतक्यात त्या कचेरीवर शत्रूचा छापा आला. आसपास बंदुकीच्या फैरीचे आवाज ऐकू येऊ लागले. तेथून निसटून जाणे कॉर्पोनॉफला अशक्य झाले. इतर बातमीदारांच्या बरोबर त्यालाहि गिरफदार करण्यांत आले. सर्वांच्या दंडाना काढण्या बांधून त्यांना तुर्कांच्या छावणीत नेण्यांत आले. तुर्कांचा अमीर फिओफरखान याचा खास तळ तेथे पडलेला होता.

—०—०—

५. अघोर शिक्षा

अमीराच्या छावणीचा थाट कांही न्याराच होता. टोम्स्क शहरावर त्याचा कबजा झाल्यामुळे सारे सैनिक मोठ्या खुषीत होते. जिकडे तिकडे आनंदाचा जल्लोष उसळला होता. लहान मोठ्या राहुटयांतून अमीराचे सरदार नाचगाण्यांत अन् दारूचे प्याले झोकण्यात दंग झाले होते. छावणीच्या मध्यभागी एक विशाल शामीयाना उभारण्यात आला होता. तेथील थाटमाट डोळे दिपविणारा होता. शामीयान्याच्या सभोवार किनखापी कनात झळकत होती. आतील खांबांना नक्षीदार कापडाचे पट्टे गुंडाळले होते. त्यावरून फुलांच्या माळा लोंबत सोडल्या होत्या. भरजरी छताला सुंदर हंड्याझुंबरे लटकत होती. मखमली गालीचे जमिनीवर अंथरलेले होते. त्यावर शिंपडलेल्या अत्तराचा सुगंध सर्वत्र दरवळला होता. चारी बाजूंच्या दारावर जाळीचे पडदे सोडलेले होते. मधल्या

भागात अमीराचे सोनेरी आसन शृंगारुन ठेवले होते. मुख्य दरवाजासमोर ' हिरवा चांद ' दिमाखाने फडकत होता. तेथे नंग्या समशेरींचा खडा पहारा होता.

खुद्द अमीर फिओफर खान घोडयावर बसून आपल्या खिदमतगारासह छावणीतून रमत गमत हिंडत होता. एके ठिकाणी नर्तकींचा नाच चालू होता. त्यांची शरीरे अर्धनग्न होती. त्या शृंगारिक हावभाव करीत खडया सुराने कव्वाली म्हणत होत्या. सभोवार उभे राहिलेले तुर्क व तार्तर सैनिक त्यांच्या गाण्याचा ठेका धरुन तोंडाने " या अल्ला, मार डाला ! वाहव्वा, बहोत खासी ! ' असे उग्दार काढून डोलत होते.

त्या नर्तकींच्या मेळयातील एका सुंदरीचा नूर अन् नखरा कांही और होता. तिच्या डोक्यावर तुरेदार मखमली टोपी चमकत होती. गळयात रत्नांच्या माळा झळकत होत्या. उन्नत उरोभागावर झिरझिरीत हिरवा दुप्पटा फडफडत होता. बारीक कमरेभोवती जरतारी झगा झगमगत होता. तिने डोळे मोडीत गिरकी मारली कीं, तिच्या झग्याचा घोळ रुंदावत जाई अन् प्रेक्षकांचे कलिजे खलास होत.

ती सुंदरी बेहोष होऊन बिजलीसारखी नाचत होती. तिच्या सुरेल कंठातून पाझरणाऱ्या गझलांच्या

तालावर ती सारी छावणी भान विसरून डुलत राहिली. खासा अमीर तेथे आला अन् तिचे उत्तान सौंदर्य बघून तो दिवाणा बनला. त्याने मूठभर सोन्याची नाणी तिच्या अंगावर फेकली. ती खूबसूरत छेलछबेली मोहक हास्य करून लचकत मुरडत अमीरासमोर आली. तिच्या गुलाबी गालावर हळूच टिचकी मारून अमीराने आपली खुषी व्यक्त केली.

एक जासूद घाईने तेथे आला. सलाम करून त्याने अमीराला वर्दी दिली. "विजय मिळवून कर्नल इव्हॅन ओगॅरेफ आपल्या मुलाखतीला येत आहे!" अमीर त्या नर्तकीकडे वळून म्हणाला, "सँगरी, नंतर येऊन तूं मला भेट!" त्याने आपला घोडा शामीयान्याकडे वळविला.

सँगरी ही अमीराची गुप्त हेर असून ती त्याच्या विशेष मर्जीतली होती. आपल्या मादक सौंदर्याने अमीराच्या गळ्यातली ती ताईत बनली होती. इव्हॅन ओगॅरेफही तिची सल्लामसलत घेत असे. तिचा शद्ब झेलायला लष्करातले शिपाई नेहमी तयार असत तिला आपल्या सौंदर्याचा फार अभिमान होता

शिंगे तुताऱ्यांचा ध्वनी त्या तळावर दुमदुमू लागला. सँगरीने मागे वळून पाहिले. घोड्यावर मोठ्या ऐटीत बसलेला, अमीराचा खासा दोस्त इव्हॅन ओगॅरेफ आपल्या

स्वारांच्यासह छावणीत मिरवत आला होता. तिने आपली भेदक नजर त्याच्यावर रोखून मधुर हास्य केले. त्या दोघांची कांहीतरी नेत्रपल्लवी झाली. सँगरी ठुमकत ठुमकत शामीयान्याकडे निघाली

अमीर फिओफर खानाने शामीयान्याच्या दाराशी येऊन ओगॅरेफचे स्वागत केले ते दोघेजण बैठकीच्या गुप्त जागी गेले. ओगॅरेफच्या शिपायांनी पकडून आणलेल्या कैद्यांना छावणीच्या दुसऱ्या भागात नेण्यात आले. त्या कैद्यांमध्ये नादिया, मार्फा, कॉर्पोनॉफ, वृद्ध संन्यासी जॉलिव्हे, ब्लाऊंट व इतर परदेशी वार्ताहरही होते !

अमीर व ओगॅरेफ या दोघांचे इकडे खलबत सुरू केले. हुक्क्याची नळी तोंडात धरून अमीर फिओफर खानाने ग्रँड ड्यूकच्या हालचाली बद्दल माहिती विचा-रली

ओगॅरेफ आपल्या पराक्रमाच्या बढाया मारून खानाला सांगू लागला; " ग्रँडड्यूक आपल्या तावडीत पुरा सापडलेला आहे. इर्कुटस्कच्या आसपासचा मुलूख आमच्या कबजात आला आहे मास्कोशी त्याचे दळण-वळण जवळजवळ तुटलेच आहे

'ते खरं, पण झार कांही स्वस्थ बसणार नाही. तो आपल्या भावाच्या मदतीसाठी सैन्य पाठविलच !'

'होय, तथापि त्या आधी आपण चढाई करून इर्कुटस्क जिंकून घेऊ या. माझे गुप्त हेर मी ग्रँड ड्यूक–च्या सैन्यात पेरून ठेवले आहेत. किल्ल्याच्या चोर वाटा ही मला माहीत झाल्या आहेत.'

'झारनही आपला गुप्त हेर आमचा भेद घेण्या–साठी इकडे पाठवला असणारच! '

'अमीर साहेब, आपला तर्क अगदी बरोबर आहे पण मी त्याच बारसं जेवलोय. त्या हेराच्या आईला मी पकडलंय. ती आमच्या हातातून आता सुटत नाही.'

ओगॅरेफ, तूं मूळचा रशियन आहेस. ऐनवेळी तुझं देशप्रम जागे होईल अन् तूं मला दगा देशील !'

' खानसाहेब, ही बातच तुम्ही विसरा आता. तुमच्या पायाची कसम खाऊन मी सांगतो कीं, प्राण गेला तरी मी तुमचा पक्ष सोडण र नाही. झारचा नक्षा उ–तरल्याखेरीज माझा तळमळणारा जीव शांत होणार नाही. ग्रँड ड्यूकला अटक करून माझ्या अपमानाचा मी बदला घेणार !'

' तुला मी माझा सच्चा दोस्त मानलाय. झारशी वैर पत्करून मी तुला माझा सरदार बनवलं अन् माझी फौज तुझ्या दिमतीला दिली. '

अन् मी तुझ्याशी इमान राखून झारचा केवढा तरी मुलूख तुम्हाला जिंकून दिला आता अगदी मोक्य च असं इर्कुटस्क शहर सर केलं कीं, तुम्ही तुर्कांचे अन् तार्तरांचे शहेनशहा व्हाल तुमच्या वैभवापुढं गर्विष्ठ झारची मान शरमेनं खाली झुकेल ! '

राजसत्तेचा अहकार मोठा विलक्षण असतो. त्याची नशा अमीराच्या डोळयावर चढली ओगॅरेफच्या पाठीवर थाप मारून तो म्हणाला, "ही मोहीम फत्ते झाली तर मी तुला इर्कुटस्कचा गव्हर्नर करीन!"

इर्कुटस्क आता जिंकल्यासारखंच आहे, तुम्ही अगदी निर्धास्त रहा. मला आता निरोप द्यावा " अमीराशी प्रेमाने हस्तांदोलन करून कालेबाज ऑगरेफ तेथून बाहेर पडला. दुसऱ्या दालाने सँगरी मुरकत अमीराजवळ आली. तिने त्याला मद्याचा चषक दिला. मद्याचे घोट घेत अमीर तिच्याशी कानगोष्टी करू लागला ती दोघे रंगात येऊन बराच वेळ हसत खिदळत राहिली अमिराने तिला सुचविले कीं, "ऑगरेफ हा फार कारस्थानी माणूस आहे. त्याच्यावर नीट नजर ठेवायला हवी ! " त्याच्या म्हणण्याला मान तुकवून ती लबाड मैना आपल्या राहुटीकडे परतली.

तार्तर सैनिकांनी पकडलेल्या वार्ताहरानी आपली फिर्याद ओगॅरेफपुढे मांडली " आंतरराष्ट्रीय कायद्या-प्रमाणं आम्हांला कुठंही जाण्याचा परवाना आहे. आम्ही कसलीही हेरगिरी करीत नाही. आमची सत्वर मुक्तता करावी !"

ओगॅरेफला त्यांचे मागणे मान्य करणे भाग पडले. त्या सर्वांना सोडून देण्यात आले. त्यांच्या बरोबर जॉलीव्हे व ब्लाऊंटहि सुटले. बाकीच्या कैद्यांना त्या छावणीत मजूराप्रमाणे राबविण्यांत येऊ लागले. व्यापारी वेषातल्या कॉर्पोनॉफला पाणी भरण्याचे काम देण्यात आले. पकडलेल्या मार्फाची हाच तो मुलगा, हे मात्र कुणालाहि माहित नव्हते. जहाजावर असताना त्या-च्याबद्दल कपटी सॅगरीला कांहीतरी निराळे वाटले होते. ती मात्र त्याच्यावर पाळत ठेऊन होती.

मार्फा व नादिया दोघीजणी छावणीतले आपले कष्टाचे काम संपल्यानंतर एका बाजूला सुखदुःखाच्या गोष्टी बोलत बसत. तराफ्यावर तार्तरांचा हल्ला झाला तेव्हां कॉर्पोनॉफ पाण्यांत पडलेला तिने पाहिला होता. तो बहुतेक बुडून मेला असावा म्हणून ती मनांत फार हळहळत होती. मार्फानेहि आपला मुलगा आपल्यास

ओळखत नाही, म्हणून तिच्याजवळ आपले दुःख प्रकट केले त्याला दुष्ट ओगॅरेफने पकडले असावे, असेहि ती नादियाला म्हणाला.

मार्फाने आपल्या मुलाचे केलेले वर्णन कॉर्पोनाफशी तंतोतंत जुळणारे आहे असे नादियाला वाटले. आपला प्रेमळ सोबती जिवंत असल्याचे जाणून तिला अतिशय हर्ष झाला. तिने मार्फाला सांगितले, "तुमचा मुलगा येथील कैद्यांमध्ये असण्याचा संभव आहे. तुम्ही मात्र त्याला आपली ओळख देऊ नका. नाहीतर आपणा सर्वांचा घात होईल ! '

त्या दोघीजणी काय बोलतात, याकडे खुनशी सॅगरीची सूक्ष्म दृष्टी होती. त्या महामायेने ओगॅरेफला एकान्तात भेटून सूचना दिली कीं, " झारचा राजदूत मायकेल स्ट्रॉगॉफ आपण पकडून ठेवलेल्या कैद्यांमध्ये असला पाहिजे पण त्याचा चेहरा मोहरा मला नक्की ओळखता येत नाही त्याची आई मार्फा अन् एक तरुणी एकमेकीशी कांहीतरी बोलत अश्रु ढाळत असतात तुम्ही त्या बुढ्ढीला चवदावे रत्न दाखवा म्हणजे तिच्या ओठातले गुपित बाहेर येईल ! "

ओगॅरेफने शिपायांच्या कडून सर्व कैद्यांना आणवून आपल्या समोर उभे केले. त्यामध्ये कॉर्पोनॉफ, नादिया व

मार्फाही होती. ओगॅरेफ व सँगरीने सर्व कैद्यांना निरखून पाहिले, पण त्यातला मायकेल स्ट्रॉगॉफ कोणता, हे त्या दोघांना निश्चित कळेना.

सँगरीच्या सूचनेवरून ओगॅरेफने मार्फाला एका बाजूला नेऊन धमकावले, " या कैद्यांतून तुझा मुलगा ओळखून काढ! "

मार्फा दीनवाणीने म्हणाली, " माझा मुलगा या कैद्यांमध्ये खरंच नाही ! "

तसा तो क्रूरकर्मा ओगॅरेफ भयंकर पिसाळला. त्याने तिला चाबकाने फोडून काढण्याचा शिपायाला हुकूम केला. मार्फाचे दोन्ही हाय पाठीमागे दोरीने बांधून टाकले. तिची पाठ उघडी केली अन् एक धिप्पाड तार्तर तिच्या पाठीवर आसुडाचे फटके सपासप मारू लागला. तिची पाठ रक्तबंबाळ होऊन ती जमिनीवर कोसळली. पण स्वदेशाच्या हिताकरता ही घोर विटंबना तिने धीराने सोसली आपल्या मुलाची ओळख दिल्याने आपल्या देशाचे नुकसान होईल, ही गोष्ट तिने जाणली होती ! माराच्या वदना असह्य होऊन मार्फा जमिनीवर गडबडा लोळू लागली. पण तिने आपला निर्धार अभंग राखला. नादिया तोंड झापून रडू लागली. दूर उभा असलेल्या कॉर्पोनफची सहनशक्ति संपली. आपल्या आईच्या मरण

यातना त्याला बघवेनात तिला झोडपणाऱ्या त्या चांडा– ळावर त्याने चित्यासारखी झडप घातली. त्याच्या कमरेत लाथ मारुन त्याच्या हातातला आसूड त्याने हिसकावून घेतला आणि त्या कुतघ्न ओगॅरेफच्या तोंडावर आसुडाचे तडाखे लगावले. तो मोठ्याने किंचाळत तोल जाऊन धपकन धरणीवर पडला. त्याच्या तोंडावर आसु- डाचा खोल वळ उठला.

लागलीच धडपडत उठून तो ओरडला, ' हाच तो मायकेल स्ट्रॉगॉफ. पकडा त्याला !"शेजारी उभे असलेले तार्तर शिपाई मायकेल अंगावर चालून गेले. एकटा मायकेल त्यांच्याशी किती वेळ झुंजणार ; त्यांनी त्याला गिरफदार केले. ओगॅरेफने त्याची अंगझडती घेतली. त्याच्या कोटाच्या आतल्या खिशांत असलेला झारचा खलिता त्याला सापडला. ओगॅरेफला आपण स्वर्ग जिक– ल्याचा आनंद झाला,

ही खूषखबर अमीराला कळविण्यात आली सर्व कैद्यांना भर चोकात नेऊन फटके मारण्याचा त्याने हुकूम सोडला मायकेल स्ट्रॉगॉफला त्याच्यापुढे नेण्यात आले त्याने ओगॅरेफला विचारले, 'हा कैदी कोण आहे ? " हा एक रशियन हेर आहे; " एवढेंच ओगॅरेफ म्हणाला."

मराठी ग्रंथ संग्रहालय. ठाणे. वाचनालय शाखा.
 अनुक्रम ७.३३५५ वि. वावा.
क्रमांक ३३७७ नोंद दि. २५।१२।६८

'हा झारचा राजदूत आहे, असे न सांगण्यात त्याचा कांही तरी कावा होता.

दारुच्या नशेत तर्र झालेला अमीर खदखद हसत बरळला, 'पुन्हा हेरगिरी करता येऊ नये म्हणून या चोराची नजर हिरावून घ्या अन् त्याला हाकलून द्या,

त्याच वेळी इतर वार्ताहराबरोबर जॉलिव्हे व ब्लाऊंट तेथे आले. त्यांना स्ट्रॉगॉफची दया आली, पण त्याच्याकरता अमीराजवळ रदबदली करण्याचा धीर त्यांना झाला नाही. राजकीय प्रश्नात तोंड न घालण्याचे त्यांचे धोरण होते.

मायकेलने नम्रपणाने अमीराला विनंती केली. 'मी बेगुन्हा आहे. माझा अर्ज आपण एकवार ऐकून घ्यावा.

पण अमीर मुठी आवळून ओरडला, "या हराम-खोराला माझ्या पुढून न्या अन् आंधळा करून टाका ! ,

शिक्षेची अमलबजावणी करणारे मांग पुढे आले. काडण्या बांधून त्यांनी मायकेलला तेथून बाजूला नेले. चांगला विस्तव पेटवला. एक पोलादी तलवार चांगली लाल होईपर्यंत तापवली. दुष्ट सँगरीनने त्या ठिकाणी मार्फाला मुद्दाम आणवली. ओगॅरेफप्रमाणे तिलाही आसुरी आनंद झाला होता. एका मांगाने मायकेलला घट्ट दाबून धरले.

आपला मुलगा आंधळा होणार या भयाने मार्फा दु:खाने ओरडू लागली. तिला तळमळताना पाहून मायकेलच्या डोळ्यात अश्रूंचा जाड थर उभा राहिला. त्याला स्वदे-शाकरता त्या लाल पोलादाची बिलकूल पर्वा वाटली नाही. दुसऱ्या मांगाने त्याच्या नजरेसमोर ती लाल तलवार धरली. त्याची नजरबंदी झाली. त्याला आपली आई दिसेना- ती बिचारी बेशुद्ध होऊन जमिनीवर पडली! ती अघोर शिक्षा पाहून नादिया व्याकुळ झाली.

उन्मत्त ओगॅरेफ खिदळत तो खलिता घेऊन मायकेलपुढे गेला अन् त्याला हिणवून बोलला, "हे आंधळ्या तूं आता खुशाल इर्कुटस्कला जा. मी मायकेल स्ट्रॉगॉफ होऊन ग्रँड डयूकला भेटतो अन् माझा सूड उगवतो.'

"हे देशद्रोहया, तूं माझी दृष्टी झाकलीस, तरी तुझं पाप झाकलं जाणार नाही. त्याची खूण तुझ्या नाकाडावर खोल उमटली आहे !"

त्या माय लेकरांना तेथे तडफडत ठेवून सॅंगरी अन् ओगॅरेफ आसुरी हास्य करीत आपल्या तंबूकडे गेले. मार्फा आपल्या मुलाला मिठी मारून आक्रोश करू लागली. नादियाने त्या दोघांचे मोठ्या धीराने सांत्वन केले.

मायकेल तिला म्हणाला, "कांहीही करून मला

इर्कुटस्कला गेलेच पाहिजे. मला आता दिसत नाही, मी काय करूं ?"

"तूं चिंता करू नकोस. मी तुला इर्कुटस्कला घेऊन जाते. आपण आता एकमेकांचे साथीदार झालो आहोत." तिने गहिवरलेल्या स्वराने त्याला धीर आला. मार्फाची समजूत घालून तिने तिला तिच्या घरी पोचती केली मायकेलचा हात धरून ती इर्कुटस्कला जाण्यास तयार झाली.

६. धैर्याची कसोटी

झारचा गुप्त खलिता मिळाल्यामुळे ओगॅरेफला आपले हात आभाळाला भिडल्याचा हर्षवायु झाला. इर्कु-टस्कला मोर्चे लावण्याची त्याला घाई झाली आपले स्वार घेऊन त्याने तिकडे कूच केले.

नादिया मायकेलला घेऊन रस्त्याने निघाली होती तो दुरात्मा इव्हॅन ओगॅरेफ, ग्रँड ड्यूकला भेट-ण्यापूर्वी मायकेलला तेथे जावयाचे होते. पण त्याची नजर बंदी झाल्याने ते जमणे अशक्य होते. पण त्याने धीर सोडला नाही वाटेत एक माणूस आपली घोडा-गाडी घेऊन निघालेला नादियाला दिसला. त्याच्याज-वळ एक कुत्रा होता त्याचे नाव सेर्को होते. नादि-याने त्याला डोळ्यात पाणी आणून विनविले. 'हा माझा भाऊ अंध आहे. कृपा करून त्याला आपल्या गाडीत बसवून घ्या !'

त्या माणसाचे नाव होते निकोलस. तो स्वभा– वाने दयाळू होता. त्याने त्या दोघांना आपल्या गाडीत बसवून घेतले. त्यांना देव भेटल्याचा आनंद झाला. त्यांचा प्रवास सुखाने सुरू झाला. वाटेत त्यांना कांही खेडी लागली, पण ती सारी उजाड नि उध्वस्त झालेली होती. तार्तरांच्या अत्याचारांच्या खुणा जागोजाग पस– रलेल्या होत्या.

रात्री त्यांनी एका पडक्या घरात मुक्काम केला. नादियाने आपली करुण कहाणी निकोलसला सांगितली. त्याच्या डोळ्यात अश्रु गोळा झाले. आपल्या जवळची शिदोरी त्याने त्या दोघांना खावयास दिली. पहाटे पुन्हा त्यांचा प्रवास सुरू झाला. वाटेत येनेसी नदी लागली. ती ओलांडायची कशी ही चिंता त्यांना पडली. कारण नदी किनाऱ्यावर कोठेही नाव दिसेना.

मायकेल स्ट्रॉगॉफच्या डोक्यात अकस्मात एक कल्पना चमकली. त्याने आपल्या अंगावरचे कपडे झर– झर उतरले. त्यातून त्याने चार रबरी घड्या काढल्या. तो नादीयाला म्हणाला, 'बरेच दिवसांचे माझें एक स्वप्न होते. ते आज खरे होणार!'

त्याने एक रबरी घडी घेऊन तोंडाने त्यात जोराने हवा भरली. तिचा फुगा भोपळ्यापेक्षाही मोठा झाला.

निकोलस व नादियाने बाकीचे फुगे फुगवले. ते चारी फुगे त्यांनी गाडीच्या चारी बाजूला लावले ती गाडी त्यांनी प्रवाहात सोडली.

आणि आश्चर्य हे की, ती गाडी तराफ्यासारखी पाण्यावर तरंगू लागली. मायकेलची युक्ती सफळ झाली. नादिया व निकोलस यांना त्याच्या चातुर्याचे फार कौतुक वाटले. एकदा प्रवाहाबरोबर घोडा वाहू लागला. तेव्हां धाडसी मायकेलने पाण्यात उडी मारून त्याला नीट सावरले तो आंधळा आहे, हे निकोलसला खरे वाटेना. त्याच्या धाडसाची त्याने फार तारीफ केली.

ते तिन्ही प्रवासी गाडीसकट पैलतीरावर सुखरूप आले. इतक्यात एक ससा त्यांच्या समोरून वेगाने पळत गेला. निकोलस हा एक देवभोळा रशियन होता. ससा वाटेत येणे हे चिन्ह त्याला बरे वाटले नाही. पण मायकेलने त्याला सांगितले की, हा शुभशकून आहे.. तूं मुळीच काळजी करू नकोस. माझं सुदैव या सशाच्या रूपानं प्रकट झाले असं तू समज !"

ते दोघे सोबती गाडीत बसले आणि ते उत्साहाने पुढे निघाले. दाट झाडीतून गोळीबाराचा आवाज त्यांच्या कानावर आला. तेथे कोठेतरी रशियन आणि

तार्तर सैनिक यांची चकमक सुरू होती. धुळीचे अन् धुराचे प्रचंड लोट आकाशात उठत होते. मोठा कोलाहल माजला होता. अकस्मात बंदुकीची गोळी सूं सूं करीत गाडीच्या घोड्याला लागली. घायाळ होऊन घोडा खाली कोसळला. ते तिघे प्रवासी भीतीने घाबरुन गेले भयंकर संकट त्यांच्यापुढे आ वासून उभें राहिले ! दैव जणूं त्यांच्या धैर्याची कसौटी पहात होते!

ते तिघेजण पायउतार होऊन दबकत पुढे निघाले 'ठेहरो' असे दरडाऊन एक तार्तर घोडेस्वार त्यांच्यासमोर आला. ते तिघे प्रवासी तार्तरांचे कैदी बनले. तार्तर शिपायांनी आपल्या दुष्ट स्वभावानुसार आंधळ्या मायकेलला एका आंधळ्या घोड्यावर बसविले अन् त्याची क्रूर चेष्टा मांडली. तो बिचारा घोड्यासकट एका खोल खड्ड्यात तोल जाऊन पडला. तो प्रकार पाहून नादिया भीतीने अगदी घाबरून गेली.

ती एकटी बघून एका जंगली तार्तराने तिच्याशी दंगामस्ती आरंभिली. ती मदतीसाठी टाहो फोडू लागली. निकोलस तिच्या हाकेला धाऊन गेला. त्याने आपले पिस्तूल त्या नीच तार्तरावर झाडले. त्याच्या मिठीतून नादिया सुटली. पण तो मात्र रानटी तार्तरांच्या ताव–

डीत सापडला. त्यांनी त्याला झोडपले व त्याची मोट बांधून त्याला एका घोड्यावर टाकले.

नादिया वेगाने पळत पळत मायकेल पडलेल्या खड्ड्याकडे गेली. तो कसा तरी धडपडत वर आला होता. नादियाने त्याला हाताशी धरुन एका बाजूला नेले व निकोलसला तार्तर शिपायांनी पकडून नेल्याचे सांगितले. निकोलसच्या सुरक्षितेबद्दल त्या दोघांना फारच चिंता वाटू लागली.

मायकेल स्ट्रॉगॉफने आतापर्यंत रेल्वे, जहाज, गाडी घोडा यांच्या सहाय्याने व पायी चालत शेकडो मैलांचे अंतर तोडले होते. तो आता नादियासह इर्कुटस्क शह-राकडे निघाला होता. त्याची जिद्द जबरदस्त होती. वैऱ्याने त्याची नजरबंद केली तरी, त्याची हिमंत अभंग होती. 'हिम्तम मर्दा तो मदत खुदा' ही म्हण त्यांच्या बाबतीत खरी ठरली. त्याची स्वामीनिष्ठा अन् देशभक्ति अलौकीक होती. तीच त्याला संकटात तारक झाली

इर्कुटस्क हे महत्वाचे शहर बैकल सरोवराच्या दक्षिणेला आहे. मायकेल व नादिया आता त्या बाजूला आली होती. नादिया चालताना फार थकली म्हणून तिला पाठंगुळीला घेऊन धाडसी मायकेल धीराने पुढे

निघाला. ती त्याला वाट दाखवीत होती. एका टेक– डीच्या पायथ्याशी त्यांनी कांही माणसांचे आवाज ऐकले· नादियाने डोळे ताणून तिकडे पाहिले व तिला आनंद झाला. टेकडीला वळसा घालून वाहणाऱ्या नदीच्या प्रवाहातून ते रशियन सैनिक व बरेच निर्वासित तराफ्या- वरून चालले. नादिया व मायकेलने त्यांना मोठ्याने हाका मारल्या. त्या रशियन सैनिकांनी त्या दोघांना आपली माणसे समजून मदतीचा हात दिला. त्या मंडळीत जॉलीव्हे व ब्लाऊंट होता. त्या दोघांनी मायकेलच्या धडाडीचे अभिनंदन केले.

ती नदी बैकल सरोवराकडे वहात होती तो तराफा पाण्यावर तरंगत चालला होता. कांही रशियन तो तराफा बांबूनी वल्हवीत होते. कांही ठिकाणी पा– ण्यावर बर्फाचे जाड थर पसरलेले होते. सैबेरीयन भागातले थंड वातावरण जाणवत होते. तो तराफा इर्कुटस्ककडे वळला, तसे पाण्यातून गरम वाफांचे बुडबुडे वर येऊ लागले !

हे थंडगार पाणी असे उकळते का, म्हणून ब्लाऊं– टने पाण्याला हात लावून पाहिला. त्यावर 'नापत्ता' नावाचे ज्वालाग्राही पसरल्याचे त्याला समजून आले.

त्यावर काडी ओढून टाकली तर सबंध नदीच पेटण्याचा महा भयंकर धोका होता. अशा स्थितीत इर्कुटस्कमध्ये कसा प्रवेश करावयाचा, हा त्याला मोठा प्रश्न पडला. तार्तर लोकांचा हा कुटीर कावा पाहून त्याचे काळीज भीतीने धडधडू लागले.

नदीच्या दुसऱ्या काठावर अंधारातून शेकोटच्या पेटलेल्या दिसत होत्या. थंडी तर मी म्हणत होती. प्रवाहातून बर्फाचे थर वहात येत होते. त्यावरून पाण्यात कोणीतरी धडाधड उड्या मारल्याचा आवाज आला. 'रानटी तार्तर आले, सावध व्हा !' अशी तराफ्यावर एकच हाकाटी झाली. स्ट्रॉगॉफला पशुपक्ष्यांचे आवाज कळत होते. तो म्हणाला. "हे तार्तर नव्हेत, बुभुक्षित लांडगे आहेत !" आपला सुरा पाजळून तो सज्ज झाला त्याने आपल्या तीक्ष्ण सुऱ्याने दहा बारा लांडग्यांना कचाकच कापून काढले. त्याची अचाट ताकद पाहून ते सारे प्रवासी चकीत झाले. त्यांनीही आपले सुरे परजले. तशी ती लांडग्यांची झुंड घाबरून तेथून पसार झाली.

पण त्याहून दुसरी मोठी आपत्ति त्यांच्यावर कोसळली. तो तराफा नजरचुकीने भलतीकडेच वहात गेला. हे लक्षात येण्याच्या आंत पलीकडच्या झाडीतून

तार्तरांचा गोळीबार चालू झाला. त्या दंगलीत पुष्कळ रशियन निर्वासित मारले गेले व तराफ्यांची दैना उडाली. मायकेलने प्रसंगावधान राखून तराफ्याची एक फळी पकडली. तिच्या आधाराने नादियाला घेऊन तो मोठ्या शिकस्तीने पैल काठावर आला त्याच्या समोर एक ऊंच दरड होती. तो तेथेच एका झुडपाआड तिच्यासह दडून राहिला. कांही वेळाने तार्तरांचा गोंगाट व गोळीबार ऐकू येईनाला झाला

त्या दोघांनी तेथे थोडा वेळ विसावा घेतला हळूहळू पण मोठ्या चिकाटीने नादियाला बरोबर घेऊन ती दरड चढण्यास मायकेलने प्रारंभ केला. दैवाने त्याच्या प्रयत्नाला यश दिले.

—o—

७. कपटाचा पाश

इर्कुटस्क हे फार प्राचीन आणि ऐतिहासिक महत्त्वाचे शहर होते. त्यावेळी झारच्या साम्राज्यात मास्को राजधानी सारखी प्रतिष्ठा त्याला प्राप्त झाली होती. ग्रँड ड्यूकचे तेथे मुख्य निवासस्थान असल्यामुळे त्या शहराला विशेष महत्व आले होते. ते मोठे लष्करी ठाणे असून तेथे बळकट किल्ला होता. त्या भागातील राज्यकारभाराचे ते एक प्रमुख केंद्र होते. तेथील बंदोबस्त अत्यंत कडक असून शहराभोवती भक्कम तटबंदी होती तिच्यासभोवार खोल खंदक असून बैकल सरोवरातून वाहणाऱ्या येनेसी नदीचे पाणी त्यात खेळविले होत व तटाच्या आत भरपूर शिबंदी रक्षणासाठी ठेवली होती त्यामुळे इर्कुटस्कचे ठाणे अभेद्य समजण्यात येत असे ते सर करून झारच्या सत्तेला शह देण्याचा व ग्रँड ड्यूकला कैद करून आपला सूड उगवण्याचा इव्हॅन ओगॅरेफने चंग

बांधला होता. स्वार्थाला बळी पडून व शत्रूला फितुर होऊन त्याने स्वदेशाचा नाश करण्याचा दुष्ट बेत केला.

तुर्क व तार्तरांची फौज जमा करुन त्याने टोबोलस्क ओम्स्क, टोम्स्क इत्यादि रशियन शहरे काबीज केली आणि आता इर्कुटस्क शहराभोवती आपले पाश पसरले. त्या सभोवार वाहणाऱ्या नदीच्या पाण्यावर त्याने गुप्तपणाने ज्वालाग्राही तेलाचे पाट सोडले होते व ते तेलमय पाणी खंदकात मिसळले होते, तटबंदीवर हल्ला सुरु करताच हे तेल पेटवून देण्याचा त्याचा मनसुबा होता. तसे झाले की रशियन सैन्याची संपूर्ण गळचेपी होऊन इर्कुटस्क पिकलेल्या फळासारखे आपल्या पदरात पडेल, अशी त्याची गुप्त योजना होती

इव्हॅन ओगॅरेफचे कपट कारस्थान हेरामार्फत ग्रँड ड्यूकला समजले होते, तार्तरांच्या स्वारीला तोंड देण्याची त्याने जय्यत तयारी केली होती. झारला त्याने खलिता पाठवून मदतीची हाक दिली. झारनेही त्या भागातील आपल्या इतर ठाणेदारांना ग्रँड ड्यूकला सहाय्य करण्याचे हुकूम पाठवले होते. तार्तरांनी दळणवळणाची साधने नष्ट करून वाटा रोखल्यामुळे झारपुढे मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले होते.

त्यावर तोडगा म्हणून अगदी खात्रीचा व तडफदार असा आपला माणूस मायकेल स्ट्रॉगॉफ याला खास राजदूत नेमून, त्याच्या बरोबर ग्रँड ड्यूकला मदतीचा संदेश धाडला होता. "आठवड्याच्या आत रसद व लष्कर तुझ्या बचावासाठी येत आहे. तूं भिऊ नकोस ! मात्र दगाबाज व घातकी फितूरापासून सावध रहा." असा मजकूर त्या लखोटयात होता.

परंतु पाचव्या प्रकरणांत सांगितल्याप्रमाणे तो महत्वाचा खलिता देशद्रोही ओगरेफच्या हातात सापडला. त्याचा उपयोग करून व ग्रँड ड्यूकला फसवून आपला नीच हेतु साधण्याच्या मनोराज्यात तो देशबुडव्या ओगॅरेफ मशगूल झाला होता अन् दैवाचा फासाही त्याला अनुकूल असा पडला होता !

त्याच सुमारास नदीची अवघड दरड चढून साहसी मायकेल स्ट्रॉगॉफ नादियासह वर आला होता. झारच्या खलित्याचा लबाडीने वापर करून फितूर ओगॅरेफ ग्रँड ड्यूकचा गळा केसाने कापणार, हे अशुभ भविष्य मायकेलला सारखे भेडसावत होते त्या दगलबाजांचा दुष्ट कावा यशस्वी होऊ नये, यासाठी त्याच्या जिवाची सारखी घालमेल चालली होती.

नादियाचा हात धरून तो लपत छपत इर्कुटस्क शहराच्या सीमेवर आला नदीवरील लाकडी प्रचंड पूल रशियन सैनिकांनी तोडून टाकले होते. त्यामुळे तार्तरी टोळ्यांना शहरात घुसणे बिकट झाले होते. त्यांनी अनेक वेळा किल्ल्यावर चढाई केली, पण रशियन व कोसॅक सैनिकांनी त्यांना प्रखर प्रतिकार करून पिटाळून लावले होते. त्या गर्दीचा फायदा घेऊन मायकेल शहराच्या वेशीपर्यंत जाऊन पोचला.

नदीच्या काठावरील दाट झाडीत अमीर फिओफर खानाचा तळ पडला होता त्याचे इव्हॉन ओगॅरेफशी गुप्त खलबत चालू होते. किल्ला स्वाधीन होत नाही म्हणून अमीर नाराज झाला होता. तो एकदम उसळून ओगॅरेफवर गुरगुरला, "तू बेवकूफ आहेस. किल्ला अजून आमच्या ताब्यात येत नाही याचा अर्थ काय ?'

" खानसाहेब, आपण असे बिथरू नका. हा लढाईचा बाका वक्त आहे. आपण जरा सबूरीनं घ्या!" इव्हॅन लाचार होऊन बोलला.

'जादा बात बस्स कर. या इर्कुटस्कवर आमचा बावटा केव्हा फडकवणार ते सांग !'

'त्याचीच तयारी मी करीत आहे. शहराभोवती मोर्चेबंदी करुन वेढ्याचा फांस आवळत आणलाय !'

'हे साफ झूट आहे. गोड बोलून तूं माझा गळा आवळून टाकशील, असा मला संशय येतोय.'

'तोबा, तोबा ! आपण काय बोलताय हे ? तुम्हाला विजय मिळून तुमचा डंका त्रिखंड दुमदुमत रहावा, म्हणून मी माझ्या जिवाचं रान करतोय. तरी देखील तुमचा विश्वास माझ्यावर बसू नये, हे आश्चर्य आहे.

' या तुझ्या थापा मी आतापर्यंत पुष्कळ ऐकल्यात. तुला संकटाच्या वेळी आश्रय दिला, प्याद्याचा फर्जी बनवला, तरी पाक दिलान तूं माझ्याशी वागत नाहीस !

'खानसाहेब, माझ्यावर असा घुस्सा आपण करूं नका तुमचे उपकार फेडण्यासाठी तळहातावर शीर घेऊन मी सारखा झुंजत आहे.'

'मग हा किल्ला अजून कसा सर होत नाही ?' अमीर दांत ओठ खाऊन ओरडला, 'माझ्या फौजेची किती खराबी झालीय ती पहा ! तुझ्या नादान मी भलत्याच फंदात पडलो अन् झारशी उगाच दुश्मनी पत्करली. तूं त्याच्याच जातीचा आहेस. मला गोत्यात आणण्यासाठी हा डाव तूं केला नसशील कशावरून? "

अमीराचे ते जहरी शब्द ऐकताच इव्हॅन ओगॅरेफचे मस्तक सुन्न झाले. काय बोलावे ते त्याला सुचेना.

त्याच्या अंगाला दरदरून घाम सुटला हात जोडून मोठ्या अजीजीने तो म्हणाला, 'मी तुमच्याशी बेमान कधीच होणार नाही. आपल्या मनातला हा संशय तुम्ही साफ काढून टाका.'

'अच्छा, हा किल्ला झटपट जिंकून तूं आमची शान वाढवली पाहिजेस !'

'त्याच खटपटीत मी चूर आहे. हा किल्ला फार दुर्गम आहे. गुप्त वेषानं शहरात जाऊन शत्रूच्या लष्करात फितुरी करावी लागेल !'

'मग इतके दिवस माशा मारत बसला होतास काय ? चोरा, ही अक्कल तुला आता सुचली होय !'

" हुजूर, माझ्यावर अशी गैरमर्जी करू नका. येत्या दोन चार दिवसातच किल्ल्यावर आपला झेंडा फडकवून मी आपले कर्तव्य पुरे करीन ! '

' इव्हॅन, नीट लक्षात ठेव. तुझा शब्द खोटा झाला तर तुला कुत्र्याच्या मौतीनं मरावं लागेल !' अमीर डोळे पिंजारून फुसकारला

' ठीक आहे. मी आपली रजा घेतो !' खानाला लवून सलाम करुन ओगॅरेफ तेथून परत फिरला.

आपल्या छावणीत येऊन झारचा खलिता त्याने आपल्या डगल्याच्या खिशात सरकावला मनाशी काही

एक निश्चय करून तो ग्रँड ड्यूकच्या मुलाखतीला निघाला.

इकडे वेशीपाशी दबकत दबकत आलेल्या मायकेलला एका रशियन सैनिकाने ओळखले मास्कोला सैन्यात नोकरीवर असतांना मायकेलशी त्याची दोस्ती झाली होती. त्याला मायकेलने आपली सारी हकीकत सांगितली. त्या सैनिकाने आपल्या कर्तव्याला जागून त्याला सहाय्य करण्याचे कबूल केले व नादियासह त्याला आपल्या घरी आश्रय दिला.

दिवस नुकताच उगवला होता. लढाईच्या धामाधुमीने सारे वातावरण धूसर झाले होते. झाडावर किंवा आकाशात एकही पक्षी फिरतांना दिसत नव्हता. मंद उजेड सभोवार पसरला होता त्या रशियन मित्राने दिलेली न्याहरी खाऊन मायकेल ग्रँड ड्यूकच्या वाड्यात कसे जावे, याचा विचार करीत बसला होता. आपल्या आंधळेपणाची त्याला फार कींव आली. डोळ्यावरुन त्याने आपला हात जोराने फिरवला. पापण्याची उघडझाप त्याने बऱ्याच वेळा केली. 'मला दृष्टी दे !' म्हणून त्याने कळवळून ईश्वराची प्रार्थना केली. आणि मौज ही की, त्याच्या हाकेला देव पावला. त्याला अंधुक दिसू लागले. ते पाहून नादिया आनंदाने वेडी झाली.

ज्यावेळी मांगाने त्याची नजर नाहीशी करण्या–साठी लालभडक तलवार त्याच्या डोळ्यांसमोर धरली, त्यावेळी आईचा आक्रोश ऐकून त्याच्या डोळ्यात अश्रूंचा जाड पडदा उभा राहिला त्या पडद्यामुळे तापलेल्या तलवारीच्या पात्याचा अनिष्ट परिणाम त्याच्या नजरेवर झाला नाही, त्याची नजर बंद झाली नसून मंद झाली होती त्याच्या सुदैवाने ती त्याला पुन्हा परत मिळाली. मायकेलचा पुनर्जन्म झाला त्याला नवीन उमेद आली.

इव्हॅन ओगॅरेफ पूर्वी इर्कुटस्कमध्ये वावरलेला होता. तेथे त्याच्या बऱ्याच ओळखी होत्या व किल्ल्यामध्ये त्याने आपले हस्तक पैशाची लाच देऊन पेरुन ठेवले होते. किल्ल्यात शिरण्याच्या चोरवाटाही त्याला ठाऊक होत्या. अशाच एका गुप्त मार्गाने तो किल्ल्यात घुसला व ग्रँड ड्यूकच्या वाड्यासमोर गेला. दरवाजावरील पहारे–कऱ्याने त्याला रोखले. पण झारचे खास दूत आपण आहोत, असे सांगून त्याने वाड्यात प्रवेश मिळविला.

त्यावेळी ग्रँड ड्यूक कॅप्टन वॉसेली फेडॉरशी किल्ल्याचे रक्षण कसे करावे, याबद्दल चर्चा करण्यात गढून गेला होता. वॉसेली फेडॉर हा इर्कुटस्कच्या नागरिकांचा पुढारी असून ग्रँड ड्यूकचा त्याच्यावर विश्वास होता.

त्याने ग्रँड ड्यूकला सल्ला दिला कीं, येथे आश्रयार्थ आलेल्या निर्वासितांना शस्त्रसज्ज करावे शिवाय सैबेरियातील कैद्यांनाही मुक्त करून सैन्यात दाखल करून घ्यावे म्हणजे शिपायांची भासणारी उणीव कमी होईल आणि झारकडून लष्करी कुमक येईपर्यंत तार्तरी हल्ल्याला आपण तोंड देण्यास समर्थ होऊ. तशी व्यवस्था करण्याला माझी तयारी आहे, आपल्याला तसे आज्ञापत्र मात्र मिळाले पाहिजे.

ग्रँड ड्यूकला ही मसलत पसंत पडली त्याने वॅसेलीला तसा हुकूम देऊन लष्करभरतीचे खास अधिकार त्याला बहाल केले. हा वॅसेली फेडॉर नादियाचा पिता होता अन् त्याला भेटण्यासाठी अनेक हालअपेष्टा सोसून मायकेल स्ट्रॉगॉफ बरोबर त्या शहरात नुकतीच आली होती.

ग्रँड ड्यूक व वॅसेली बोलत असताना झारकडून खास जासूद आल्याची वर्दी पहारेकऱ्याने दिली. त्या दोघांनाही त्यामुळे आनंद झाला. राजद्रोही इव्हॅन ओगॅरेफ रशियन राजदूताच्या वेषात मोठ्या अदबीने तेथे हजर झाला. मस्तक नम्र करुन त्याने झारचा खास खलिता ग्रँड ड्यूकच्या स्वाधीन केला. कॅप्टन वॅसेली थोडा दूर राहून ओगॅरेफकडे सूक्ष्म दृष्टीने पाहू लागला

डयूकने त्याच्या चर्येकडे निरखून पाहिले. मायकेलने मारलेल्या आसूडाचे डाग ओगॅरेफच्या चेहऱ्यावर उमटले होते. त्याच्याबद्दल डयूकचे मत कांही बरे झाले नाही.

त्याला डयूकने विचारले, "मास्कोहून तूं केव्हा निघालास ?"

नक्की दिवस किती, ते एकदम न सांगता आल्यामुळे ओगॅरेफ मनात गडबडला. तो अडखळत म्हणाला, दहाबारा दिवसापूर्वी !"

"झारने तुला आणखी कांही सांगितलं आहे काय ?"

"होय महाराज, तार्तरांचा जोर सारखा वाढतोय. किल्ला लढवून शिपायांचे नाहक बळी देण्यात फायदा नाही, असं बादशहा बोलले."

"पण मी किल्ला लढविणार आहे !"

"आपली मर्जी सरकार ! ते शहाणपणाचं होणार नाही–"

"असं तुला वाटतं ?"

"नाही, तसं बादशहांचं मत आहे."

"काय रे, तार्तरांच्या मगरमिठीतून तूं इथवर सुखरूप कसा आलास ?"

"महाराज, वाटेत माझे भयंकर हाल झाले. पण राजाच्या अन् राष्ट्राच्या सेवेसाठी मी माझे प्राण पणाला

लावले. आपल्या पायांच्या पुण्याईनं मला आपलं दर्शन होऊ शकलं ”

“ शाब्बाश, मी तुझ्या देशभक्तीचा खास बहुमान करीन. तुझं नांव काय रे ! ”

त्या प्रश्नासरसा ओगॅरेफ थोडा बिचकला. तो घुटमळत उग्दारला. “ माझं नाव मायकेल स्ट्रॉगॉफ ! पण माझं नांव धारण करुन देशद्रोही इव्हॅन ओगॅरेफ इथं आला तर ? ”

“ त्याला मी चांगलंच बक्षीसच देईन. त्याची फिकीर तूं बाळगू नकोस. माझ्या वाड्यातल्या खासगी दालनात तुझ्या राहण्याची मी सोय करीत आहे.” द्वार–पालाला हाक मारुन ड्यूकने त्या पाहुण्याची सोय करण्याबद्दल त्याला सूचना दिली. इर्कुटस्क आपल्या मुठीत आल्याच्या आनंदात ओगॅरेफ गुंग झाला. आपल्या पाशात ग्रँड ड्यूकचे सावज पक्के सांपडले म्हणून त्याने स्वतःची पाठ स्वतःच्या हाताने थोपटून घेतली !

ग्रंथालय शिक्का
क्र. ...१२२५८...
वि. बालवाङ्‌मय
मराठी ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम ४९९७५
क्रमांक ...३३७५...
IRBK-0112279